रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक १०
www.ramprahar.com

◆ सोमवार, २७ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग

पैशांअभावी शस्त्रक्रिया थांबणार नाहीत -मुख्यमंत्री/२

मोहोपाड्यातील कुटुंबाचा शतकभराचा कलावारसा/५

स्क्वॅशपटू अनाहत सिंगने रचला इतिहास!/८

## पेपरफुटी रोखण्यासाठी हाय-पॉवर टास्क फोर्स होणार स्थापन



**नवी दिल्ली** : पेपरफुटीविरोधात सोमवारी (दि.२७) कडक कायदा आणला जाणार असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इन्स्टाग्राम व्हिडीओच्या माध्यमातून दिली तसेच पेपरफुटी रोखण्यासाठी नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली हाय–पॉवर टास्क फोर्सची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा केली. "विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी केंद्र सरकार अनेक पावले उचलत आहे. ज्या लोकांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्याचा प्रयत्न केला, ते आज तुरुंगात आहेत. सरकारने याआधीच फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना केलेली आहे. आता संसदेत कठोर नवा कायदा करणार आहोत, मात्र एवढ्यावरच न थांबता आपल्या परीक्षा विश्वासार्ह आणि पारदर्शक झाल्या पाहिजेत यासाठी हाय पॉवर टास्क फोर्सची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून सर्वच परीक्षांमधील सुधारणांवर लक्ष केंद्रित केले जाईल," असे पंतप्रधानांनी सांगितले.

# सुरक्षित, सक्षम आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीचा निर्धार दृढ करूया -पीएम मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संरक्षण उत्पादन असो, संरक्षण निर्यात असो किंवा मित्र देशांसोबतचे राजकीय सहकार्य असो, भारत सातत्याने नवी उंची गाठत आहे. भारताची संरक्षण उपकरणे आणि तंत्रज्ञानावरील जगाचा विश्वास वाढत आहे. कारगिल विजय दिवसानिमित्त सुरक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर–स्वावलंबी भारताच्या उभारणीचा आपला निर्धार अधिक दृढ करूया, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. 'मन की बात'मधून त्यांनी रविवारी (दि. २६) देशवासीयांशी संवाद साधला.



पंतप्रधान म्हणाले, आजचा भारत आपल्या वीरांचे केवळ स्मरणच करत नाही, तर त्यांच्या शौर्यगाथाही नव्या पिढीपर्यंत पोहचवत आहे. याच भावनेतून यंदा विशेष शौर्य विजय यात्रा आयोजित करण्यात आली आहे. १४ जुलै रोजी दिल्लीच्या नॅशनल वॉर मेमोरियल या राष्ट्रीय युद्ध स्मारकावरून सुरू झालेली ही दुचाकी फेरी द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकापर्यंत पोहचेल. राष्ट्रासाठी जवानांनी दिलेले बलिदान कधीही विसरता येत नाही याची जाणीव ही यात्रा आपल्याला करून देते. काही दिवसांपूर्वीच भारतीय नौदलाच्या ताफ्यात 'आयएनएस महेंद्रगिरी' ही युद्धनौका समाविष्ट करण्यात आली. या आधुनिक युद्धनौकेची रचना भारतातच केली गेली आहे आणि उभारणीही भारतातच झाली आहे. यात ७५ टक्क्यांहून अधिक स्वदेशी साहित्याचा वापर झाला आहे. हे आत्मनिर्भर भारताच्या वाढत्या शक्तीचे प्रतीक आहे.

येत्या ७ ऑगस्ट रोजी आपला देश राष्ट्रीय हातमाग दिवस साजरा करणार आहे. आपल्या विणकर बांधवांनी पिढ्यान् पिढ्या चालत आलेली समृद्ध परंपरा जतन करत ती पुढील पिढीपर्यंत पोहचवली आहे. चला, आपण स्थानिक उत्पादनांच्या आग्रहाची व्यापक भावना अधिक सशक्त करूया, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, २७ जुलै रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी आहे. योगायोगाने याच आठवड्यात गुरुपौर्णिमा ही अशा सर्व गुरूंप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आहे. काही आठवड्यांनंतर आपण आपल्या स्वातंत्र्याचा महोत्सवही साजरा करू. दरवर्षी १५ ऑगस्टपूर्वी तुम्ही मला अनेक विचार आणि सूचना पाठवता. यंदाही तुम्ही तुमचे विचार MyGovवर नक्की व्यक्त करा.

### विद्यार्थी, खेळाडू आणि वैज्ञानिकांचे कौतुक

मन की बात कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील विद्यार्थी, खेळाडू, वैज्ञानिक आणि नवउद्योजक यांच्या यशाचे कौतुक केले. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचा विशेष उल्लेख त्यांनी केला तसेच भारताच्या पहिल्या खासगी रॉकेट 'विक्रम–१'च्या यशस्वी प्रक्षेपणाने युवा संशोधकांनी कल्पनेपलीकडचे यश मिळवले आहे, असे नमूद केले. क्रीडा क्षेत्रात बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू जपान ओपन जिंकणारी पहिली भारतीय ठरली, तर महिला क्रिकेट संघाने लॉर्ड्स मैदानावर कसोटी सामना जिंकत इतिहास रचल्याबद्दल पंतप्रधानांनी त्यांचेही अभिनंदन केले.

## प्रल्हाद जोशी यांनी स्वीकारला केंद्रीय शिक्षण मंत्रिपदाचा कार्यभार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर या खात्याचा पदभार प्रल्हाद जोशी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्यांनी शिक्षण मंत्रिपदाची सूत्रे स्वीकारत मंत्रालयात कामकाजाचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे.



प्रल्हाद जोशी यांनी यापूर्वी केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची खाती सांभाळली आहेत. ३० मे २०१९ रोजी त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून पहिल्यांदा शपथ घेतली. त्या काळात त्यांच्याकडे संसदीय कामकाज, कोळसा आणि खाण मंत्रालयांचा कार्यभार देण्यात आला, जी जबाबदारी त्यांनी जून २०२४पर्यंत सांभाळली. २०२४च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर त्यांच्याकडे ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण, आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयांची जबाबदारी देण्यात आली.

प्रल्हाद जोशी यांनी १९८३मध्ये कर्नाटक विद्यापीठाशी संलग्न असलेल्या धारवाड येथील काडसिद्धेश्वर आर्ट्स कॉलेजमधून बॅचलर ऑफ आर्ट्सची पदवी संपादन केली आहे. शिक्षण मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एक आढावा बैठक घेत मंत्रालयाच्या प्राधान्य योजना व धोरणात्मक कामांना गती देण्यावर विशेष लक्ष दिले जाईल, असे संकेत दिले आहेत.

## मेळघाट हादरला! आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा

**अमरावती : प्रतिनिधी**

मेळघाटामध्ये धारणी तालुक्यातील टीटंबा येथील शासकीय पोस्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळेत शनिवारी जेवणानंतर विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ व पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने एकच खळबळ उडाली. बाधित विद्यार्थ्यांना धारणी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

निकृष्ट दर्जाच्या अन्नामुळेच ही घटना घडल्याचा आरोप पालकांकडून होत असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## संपूर्ण भारत पंतप्रधान मोदींच्या पाठीशी –मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

देशहित आणि तरुणाईच्या भविष्याचा विचार करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या संवेदनशील निर्णयांबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. संपूर्ण देश मोदीजींच्या पाठीशी आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते रविवारी (दि.२६) प्रसारमाध्यमांसोबत बोलत होते.



मुंबईत उद्धव ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठाकरेंना उत्सव साजरा करण्याची संधी मिळाली याचा आनंद आहे, असा टोला लागवला. भारतविरुद्ध भाजप असा संघर्ष असल्याच्या वक्तव्यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ठाकरे यांचे असे संवाद अनेक वर्षांपासून ऐकत असून कुणीही त्याकडे लक्ष देत नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संवेदनशीलता दाखवत निर्णय घेतला आहे. तरुणांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी सोमवारी संसदेत विधेयक मांडण्यात येणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात या लोकप्रिय रेडिओ कार्यक्रमाचे रविवारी भाजपच्या पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत सामूहिक श्रवण करण्यात आले. यावेळी भाजप शहराध्यक्ष नगरसेवक सुमित झुंजारराव यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. हा कार्यक्रम नवे उपक्रम राबविण्याची ऊर्जा, प्रेरणा आणि सकारात्मक विचार देणारा असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.**



## निवडक

### आसाममध्ये कारखान्यात स्फोट; चार कामगारांचा मृत्यू

**दिसपूर** : आसाममधील कछार जिल्ह्यात पंग्राम येथे रविवारी (दि.२६) सकाळी रॉड उत्पादन करणाऱ्या एका कारखान्यात भीषण स्फोट होऊन किमान चार कामगारांचा मृत्यू, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. स्फोट इतका शक्तिशाली होता की इमारतीचे काही भाग पूर्णपणे कोसळले. घटनेची माहिती मिळताच पोलीस, प्रशासन, अग्निशमन दल आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले.

### भारताची 'गोल्डन क्वीन' मीराबाई चानूची सुवर्ण हॅट्ट्रिक

**ग्लासगो** : भारताची स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानूने पुन्हा एकदा इतिहासाला गवसणी घातली आहे. ग्लासगो (स्कॉटलंड) येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ स्पर्धेतील वेटलिफ्टिंग क्रीडा प्रकारातील ४८ किलोग्रॅम वजनी गटात मीराबाईने १९० किलोग्रॅम वजन उचलून सुवर्णपदकाची कमाई केली. यासह हे कॉमनवेल्थ स्पर्धेत तिचे सलग तिसरे सुवर्णपदक ठरले आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रायगड ॲग्रो फूड मार्टचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकऱ्यांकडून थेट ग्राहकांपर्यंत दर्जेदार कृषी उत्पादने पोहचवण्याच्या उद्देशाने पनवेल येथील सुकापूर परिसरात सुरू करण्यात आलेल्या रायगड ॲग्रो फूड मार्टचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. भारतीय किसान संघाच्या सहकार्याने स्थापन श्री रायगड ॲग्री मिशन नवकृषक फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या वतीने हा उपक्रम आहे.

कार्यक्रमाला बासिझ फंड सर्व्हिस प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक सीए आदित्य शेष, नीती आयोगाचे माजी अधिकारी दीपक जांभेकर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, शेतकरी, नागरिक उपस्थित होते.

रायगड ॲग्रो फूड मार्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला ताजा भाजीपाला, धान्य, मसाले, दुग्धजन्य पदार्थ तसेच अन्य कृषी उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ आणि ग्राहकांना दर्जेदार उत्पादने उपलब्ध करून देण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

## चिरनेरच्या अक्कादेवी धरणावर पर्यटकांची गर्दी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील निसर्गरम्य अक्कादेवीच्या धरणावर रविवारच्या सुट्टीनिमित्त पर्यटकांनी गर्दी केली होती. सध्या सुरक्षेच्या दृष्टीने जिल्ह्यातील जवळपास सर्वच मोठ्या पर्यटनस्थळी बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे अक्कादेवी धरण चांगला पर्याय आहे.

२५ सप्टेंबर १९३० रोजी ब्रिटिशांविरुद्ध झालेल्या चिरनेर जंगल सत्याग्रहाची साक्ष देणाऱ्या अक्कादेवी धरणाला ऐतिहासिक महत्त्व आहे. या छोट्याशा धरणाच्या तीन दिशांना डोंगर असून सध्या हा परिसर हिरवागार बनला आहे. या धरणातून ओसंडून वाहणारे पावसाचे पाणी अंगावर घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने या ठिकाणी आकर्षित होताना दिसत आहेत.

विशेष म्हणजे येथील धरणाची उंची अधिक नसल्याने पर्यटकांसाठी विशेषतः लहान मुले, महिलांसह कुटुबीयांना हे ठिकाण सुरक्षित मानले जाते तसेच येथे कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नसून पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत.





# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कबड्डी पंच प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने, भारतीय जनता पार्टी स्पोर्ट्स सेल रायगड जिल्हा आणि विद्यार्थीराजा कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अँड रिसर्च, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कबड्डी पंच परीक्षा व प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ रविवारी (दि. २६) उत्साहात पार पडला.



शिबिराचे उद्‌घाटन पनवेल भारतीय जनता पार्टी मंडळाचे अध्यक्ष तथा नगरसेवक दशरथ म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्पोर्ट्स सेल, भाजप रायगड जिल्हा क्रीडा संयोजक तथा आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम यांनी प्रास्ताविक करीत शिबिराच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त हे शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी बी.पी.एड. कॉलेजचे प्राचार्य मानमोडे, छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर, आंतरराष्ट्रीय कबड्डी पंच रवींद्र म्हात्रे, पनवेल पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी भालचंद्र पाटील, कबड्डी पंच विश्वनाथ म्हात्रे, बी.पी.एड. कॉलेजचे संचालक पदमसिंह यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात कबड्डीचे नियम, मैदानावरील प्रात्यक्षिके, व्हिडीओ विश्लेषण, प्रशिक्षित तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच पंच परीक्षा यांचे आयोजन करण्यात आले. ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मान्यवरांनी अशा उपक्रमांमुळे गुणवत्तापूर्ण खेळाडू घडण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी परिश्रम घेतले.





## उरणमध्ये कारगिल विजय दिनानिमित्त 'मन की बात'चे सामूहिक श्रवण

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात आणि आमदार महेश बालदी यांच्या जनसंपर्क कार्यालयात कारगिल विजय दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे सामूहिक श्रवण करण्यात आले. यावेळी आमदार महेश बालदी, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कारगिल युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या अमर जवानांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कारगिलच्या शौर्यगाथा पुढील पिढ्यांपर्यंत पोहचविण्याचे आवाहन करत राष्ट्रसेवा, कर्तव्यभावना आणि देशभक्तीचा संदेश दिला.

पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, स्वच्छता, 'वोकल फॉर लोकल', जनभागीदारी आणि समाजपरिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या नागरिकांचे कौतुक करत 'विकसित भारत' घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

# श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात आषाढी एकादशी उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात आषाढी एकादशीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी महाराष्ट्रातील अनेक भागातून भाविक पंढरपूरला जातात आणि विठूरायाचे दर्शन घेतात. वेगवेगळ्या प्रकारच्या अभंग आणि कार्यक्रमात अवघी पंढरी भक्तिमय होते. याच दिनाचे औचित्य साधत विद्यालयात मोठ्या उत्साहात आषाढी एकादशीचा सोहळा साजरा करण्यात आला.



यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळे कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे अभंग गायन केले तसेच वेगवेगळे भक्तिमय नृत्य सादर केले. चिमुकल्यांमध्ये कोणी विठ्ठल झाले, तर कोणी रुक्मिणी झाले, तर कोणी पुंडलिक झाले. जणू काही पंढरी या विद्यार्थ्यांच्या रूपात विद्यालयात अवतरली असे भासत होते. विद्यार्थ्यांनी सुंदर भाषण करीत आषाढी एकादशीचे महत्त्व सांगितले.

२४ आणि २५ जुलै असा सतत दोन दिवस आषाढी एकादशीचा सोहळा विद्यालयात भक्तिमय वातावरणात रंगला. विद्यार्थ्यांसमवेत सर्व शिक्षकवृंद विठ्ठलाच्या भक्तीत लीन झाले होते. यावेळी विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, एज्युकेशन इन्स्पेक्टर संतोष चव्हाण, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे, सर्व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत आणि मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. भक्तिमय वातावरणात आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

## पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील आसूडगाव येथे बांधकामासाठी खोदण्यात आलेल्या आणि पाण्याने भरलेल्या उघड्या खड्ड्यात पडून १२ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे.

आसूडगाव येथील गावदेवी मंदिरासमोरील मोकळ्या जागेत एका इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सुरक्षेसाठी बांधकामाच्या बाजूने पत्रे लावण्यात आले होते, मात्र बांधकामासाठी खोदलेला मोठा खड्डा उघडाच ठेवण्यात आला होता. पावसाचे पाणी साचल्याने या खड्ड्याने तळ्याचे स्वरूप घेतले होते. पीयूष नावाचा हा १२ वर्षीय मुलगा खेळताना अचानक या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात पडला आणि बुडू लागला. ही माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली आणि नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कळंबोली अग्निशमन दल आणि खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पथक तातडीने दाखल झाले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी रबरी बोट, दोरी आणि सुरक्षा उपकरणांच्या मदतीने सुमारे ३० मिनिटे शोधमोहीम राबवली. अखेर मुलाला पाण्याबाहेर काढून उपचारासाठी पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

## तळोजात गोवंशाची वाहतूक उधळली; ३.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोवंश मांसाची अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रकवर धाड टाकून पोलिसांनी सुमारे तीन लाख ७५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही कारवाई धानसर गावातील मस्जिद ठाकूरपाडा येथील पेट्रोल पंपासमोर करण्यात आली. झहीर इस्माईल कुरेशी (४३, रा. मिरा-भाईंदर) याच्या ताब्यातील आयशर ट्रक (एमएच-०४-एमआर-४९५८) मधून सुमारे १,५०० किलो गोवंश मांस, जनावराचे मुंडके तसेच इतर अवयव आढळून आले. याप्रकरणी पोलीस शिपाई अझरुदीन अजीज पठाण यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२५, महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम १९७६ सुधारणा १९९५ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला; आरोपी काही तासांत जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील तक्का सिग्नलजवळील शिवम आर्ट्स दुकानात काम करणाऱ्या २४ वर्षीय तरुणावर मध्यरात्री धारदार कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आला. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी आरोपीला अवघ्या काही तासांत अटक करून हल्ल्यात वापरण्यात आलेला कोयताही जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शाकिब समीर खान (२४, रा. कोळखे, ता. पनवेल) हे तक्का सिग्नल परिसरातील शिवम आर्ट्स येथे रेडियमचे काम करतात. २३ जुलैच्या मध्यरात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास ते दुकानात काम करत असताना आरोपीसोबत किरकोळ कारणावरून वाद झाला. या भांडणातून आरोपीने मागून येऊन शाकिब यांच्या डोक्यावर धारदार कोयत्याने वार केला. अचानक झालेल्या हल्ल्यानंतर जखमी शाकिब यांनी दुकानाबाहेर धावत जाऊन हल्लेखोराचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र अंधार आणि पावसामुळे आरोपी पसार झाला.

काही अंतर गेल्यानंतर डोक्यातून रक्तस्त्राव होत असल्याचे लक्षात आल्याने ते पुन्हा दुकानात परतले. त्यावेळी दुकानातच हल्ल्यासाठी वापरण्यात आलेला कोयता पडलेला आढळला. गुप्त माहितीच्या आधारे आरोपी नाविद आरिफ शेख (२८, रा. वडघर, पनवेल) हा पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात लपला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी त्याला जेरबंद केले.

# सनातन संस्थेच्या वतीने कोपरखैरणे, पनवेलमध्ये गुरुपौर्णिमा महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

अमेरिका-इराण युद्धाची झळ भारतीयांना अल्पाधिक प्रमाणात बसत आहे. भारतातील आतंकवाद, नक्षलवाद, 'लव्ह जिहाद', 'लँड जिहाद', धर्मांतर, गोहत्या आदी समस्यांत 'कार्पोरेट जिहाद', 'जैविक जिहाद' यांसम नव्या संकटांची भर पडली आहे. सामान्य व्यक्तीला वरीलपैकी कोणत्याही संकटाला सामोरे जावे लागू शकते. अशा संकटसमयी काय करावे, याचे उत्तर भारताचे अद्विवितीयत्व असलेल्या गुरु-शिष्य परंपरेने आधीच देऊन ठेवले आहे. ते समाजापर्यंत पोचवावे, यासाठी सनातन संस्था यंदाचा गुरुपौर्णिमा महोत्सव हा रामराज्याच्या निर्मितीची दिशा स्पष्ट करणारा उत्सव म्हणून साजरा करत आहे. हा उत्सव बुधवारी (दि. २९) होत आहे.

कै. अण्णासाहेब पाटील मेमोरियल हॉल, लोकमान्य टिळक कॉलेजसमोर, सेक्टर ५, कोपरखैरणे, तर बँक्वेटस हॉल, शबरी हॉटेलच्या मागे, सेक्टर १/एस, नवीन पनवेल येथे महोत्सव होणार आहेत. शिवाय माटुंगा, विलेपार्ले, भांडुप, ठाणे, डोंबिवली, कल्याण येथेही या महोत्सवांचे आयोजन करण्यात आले असून मराठी, हिंदी, गुजराती, कन्नड, तेलुगु, मल्याळम् आदी विविध भाषांमध्ये देशभरात ८१ ठिकाणी सनातन संस्थेच्या वतीने या महोत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात श्री व्यासपूजन आणि प.पू. भक्तराज महाराज यांचे प्रतिमापूजन (गुरुपूजन), सनातन संस्था आणि संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे कार्य यावर लघुपट, धर्मरक्षक आणि हिंदुनिष्ठ यांचे सत्कार, राष्ट्रभक्त अन् धर्मनिष्ठ मान्यवरांचे मार्गदर्शन, स्वसंरक्षणाच्या सोप्या पद्धतींची प्रात्यक्षिके, रामराज्याच्या स्थापनेसाठीचा संकल्प आणि नामजप, तसेच 'रामराज्य अर्थात हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठीचा संघर्ष आणि दिशा' या विषयांवरही मान्यवर वयांचे विशेष मार्गदर्शन होणार आहे.

महोत्सवात ग्रंथप्रदर्शन, राष्ट्रधर्म विषयक फलक प्रदर्शनही लावण्यात येणार आहे. या अमूल्य पर्वणीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी ७२०८१३०८३०वर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेने केले आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी (दि. २७) पनवेल येथे भव्य जनआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांना मोफत नेत्र तपासणी, मोफत चष्म्यांचे वाटप तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शिबिर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत गुणे हॉस्पिटलजवळ, भाजी मार्केट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पनवेल येथे होणार आहे.

व्हिजन फ्रेंड साकीब गोरे यांच्या सहकार्याने 'देवाभाऊ चष्मा' या उपक्रमांतर्गत गरजू तिथे चष्मा व मोतीबिंदूचे निवारण हे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून शिबिराचे उद्‌घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. शिबिराचा लाभ घेण्यासाठी लाभार्थींनी आधार कार्ड लिंक असलेले पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा अन्य कोणतेही वैध ओळखपत्र तसेच मोबाईल सोबत आणणे आवश्यक असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.

या शिबिरात परिसरातील नागरिकांनी सहभागी होऊन मोफत नेत्रसेवा व आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगरसेविका दर्शना भोईर यांनी केले आहे.

## पाचव्या मजल्यावरून पडून कामगार ठार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील हरिग्राम येथे बांधकाम सुरु असलेल्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडून बांधकाम कामगाराचा हकनाक बळी गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना न करता कामगारांकडून धोकादायक स्थितीत काम करून घेतल्यामुळे सदर दुर्घटना घडल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या दुर्घटनेला जबाबदार धरुन संबंधित बांधकाम विकासकाविरुध्द निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## 'सीकेटी'तर्फे शिक्षकांसाठी मेडिटेशन अँड वेलनेस प्रोग्राम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात (ज्युनिअर कॉलेज) सांस्कृतिक समितीतर्फे गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून सर्व शिक्षकांसाठी 'मेडिटेशन अँड वेलनेस प्रोग्राम'चे आयोजन नवीन पनवेल येथील बाबूजी मेमोरियल आश्रम श्री रामचंद्र मिशन मेडिटेशन सेंटर येथे करण्यात आले होते.

मेडिटेशन सेंटरमधील मॅनेजर गिरीश गग्गर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अविनाश नारायणकर, डॉ. मनीषा नारायणकर यांच्यातर्फे ५० शिक्षकांना मेडिटेशनचे लेक्चर्स व प्रत्यक्षिकांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. दैनंदिन जीवनात धावपळीच्या युगात ताणतणाव कमी करण्यासाठी मेडिटेशन प्रोग्राम अतिशय महत्त्वपूर्ण आहे.



या मेडिटेशन प्रोग्रॅमसाठी सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान विभाग सहाय्यक शिक्षिका माधुरी पाटील यांनी केले.

## ट्रेलर-पीकअपच्या अपघातात क्लिनर ठार

**पनवेल : वार्ताहर**

मुसळधार पाऊस आणि दाट धुक्यामुळे समोरील ट्रेलर न दिसल्याने पळस्पे-जेएनपीटी रोडवर पिकअप वाहन ट्रेलरच्या मागील बाजुस जोरदार धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात पिकअपमधील क्लिनरचा मृत्यू तर चालक जखमी झाल्याची घटना घडली.

या अपघातातील पिकअप पनवेल येथून जेएनपीटीच्या दिशेने जात होते. यावेळी पळस्पे जेएनपीटी मार्गावरील निसर्ग ढाब्याजवळ पिकअप वाहन आले असताना, मुसळधार पाऊस आणि दाट धुक्यामुळे चालकाला समोरील ट्रेलर निदर्शनास आला नाही. त्यामुळे भरधाव वेगात असलेली पिकअप गाडी ट्रेलरच्या मागील नाजुस धडकली. या अपघातात चालक संदेश केसरे (४२) आणि त्याच्यासोबत बसलेला अशोक दत्तात्रय मस्कर (५४) असे दोघे गंभीर जखमी झाले. दोघांनाही कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## संपादकीय

# जीवनदायी पाऊस

सध्या पडत असलेल्या पावसाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा आशेचे किरण आणले आहे. धरणसाठा, भूजल आणि शेतीला मिळालेला दिलासा ही राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठीही सकारात्मक बाब आहे, परंतु या वरदानाचे दीर्घकालीन संपत्तीत रूपांतर करण्याची जबाबदारी समाज आणि प्रशासन या दोघांचीही आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या शेतीचे भवितव्य आजही मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. म्हणूनच वेळेवर आणि पुरेसा पडणारा पाऊस हा केवळ हवामानाचा विषय राहत नाही, तर तो आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विकासाशी जोडला जातो. महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत बऱ्यापैकी पाऊस झाल्याने शेतकरी, नागरिक आणि प्रशासन या सर्वांनाच दिलासा मिळाला आहे. गेल्या काही वर्षांत कधी अतिवृष्टी, तर कधी दुष्काळ अशा टोकाच्या परिस्थितींना सामोरे जावे लागले होते. त्या पार्श्वभूमीवर यंदाचा संतुलित पाऊस आशादायक ठरत आहे. पावसामुळे खरीप हंगामातील पेरण्या वेळेत पूर्ण झाल्या आहेत. भात, सोयाबीन, कापूस, मका, डाळी आणि इतर पिकांच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांचा उत्पादनावरील विश्वास वाढला असून ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. शेतीमध्ये वाढणारे उत्पादन म्हणजे बाजारपेठेतील उलाढाल, रोजगाराच्या संधी आणि ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांना मिळणारी गती होय. चांगल्या पावसाचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे धरणे, तलाव आणि जलाशयांमध्ये वाढणारा पाणीसाठा. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होते. शहरांसह ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी होते. भूजल पातळी वाढल्याने विहिरी आणि बोअरवेलनाही नवसंजीवनी मिळते. औद्योगिक आणि नागरी विकासालाही याचा मोठा आधार मिळतो. पावसामुळे पर्यावरणालाही नवी ऊर्जा मिळते. जंगलांची हिरवाई वाढते, नद्या-नाले प्रवाही होतात, जैवविविधतेचे संवर्धन होते. पर्यटनस्थळांवर पर्यटकांची गर्दी वाढते. ग्रामीण पर्यटन आणि स्थानिक व्यवसायांना त्याचा फायदा होतो. पावसामुळे वातावरणातील उष्णतेचा प्रभाव कमी होऊन नागरिकांनाही दिलासा मिळतो. तथापि, चांगला पाऊस म्हणजे सर्व समस्या संपल्या असा समज करून चालणार नाही. काही भागांत अतिवृष्टीमुळे पूरस्थिती, दरडी कोसळणे, रस्त्यांचे नुकसान आणि शेतीचेही मोठे नुकसान होऊ शकते. शहरांमध्ये पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे आणि नागरी व्यवस्थेतील त्रुटीही समोर येतात. त्यामुळे पावसाचे स्वागत करतानाच आपत्ती व्यवस्थापनही तेवढेच सक्षम असणे आवश्यक आहे. याचबरोबर जलसंधारणाला अधिक प्राधान्य देण्याची गरज आहे. पाऊस पडत असताना त्यातील प्रत्येक थेंब अडविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. शेततळी, बंधारे, जलसाठे, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि नदी पुनरुज्जीवन यांसारख्या उपाययोजना सातत्याने राबविणे ही काळाची गरज आहे. आज पडणारा पाऊस उद्याच्या उन्हाळ्यात उपयोगी पडला, तरच त्याचे खरे महत्त्व सिद्ध होईल. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पावसाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे केवळ निसर्गावर अवलंबून न राहता आधुनिक तंत्रज्ञान, अचूक हवामान अंदाज, पीक नियोजन आणि जलव्यवस्थापन यांचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांपर्यंत योग्य वेळी माहिती पोहचली, तर नुकसान कमी करून उत्पादनात वाढ साधता येऊ शकते. पाऊस हा निसर्गाने दिलेला अमूल्य आशीर्वाद आहे, मात्र त्याचे रूपांतर कायमस्वरूपी समृद्धीत करण्यासाठी सुयोग्य नियोजन, प्रभावी जलव्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक विकासाची जोड आवश्यक आहे.**

# जेव्हा एखादे झाड कोसळते तेव्हा...

एखादे झाड कोसळले की आपल्या नजरेसमोर सर्वप्रथम दिसते ते म्हणजे अडथळा. रस्ता बंद होतो, वाहतूक विस्कळीत होते, वीजपुरवठा खंडित होतो, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो आणि प्रशासन तातडीने मदतकार्याला लागते. काही तासांत झाड हटवले जाते, रस्ता पुन्हा मोकळा होतो आणि शहर पुन्हा आपल्या दैनंदिन गतीने धावू लागते, परंतु त्या झाडासोबत निसर्गाने मागे ठेवलेले सर्वात मौल्यवान दान आपण अनेकदा दुर्लक्षित करतो.

जुलै २०२६च्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्रात झालेल्या मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यांनी मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि परिसरातील अनेक शहरांना मोठा फटका बसला. शेकडो झाडे उन्मळून पडली. अनेकांची मोडतोड झाली. अशा वेळी प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, अग्निशमन दल, पोलीस, वीज वितरण संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी अत्यंत तत्परतेने काम करून जनजीवन पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला. प्रसारमाध्यमांनी घटनांची माहिती जनतेपर्यंत पोहचवली. पर्यावरण क्षेत्रातील विविध संस्था दीर्घकालीन पर्यावरणीय प्रश्नांकडे लक्ष वेधत राहिल्या. प्रत्येकाने आपापली भूमिका जबाबदारीने पार पाडली, मात्र संकट ओसरल्यानंतर एक वेगळी जबाबदारी आपली वाट पाहत असते, ती म्हणजे समजून घेण्याची जबाबदारी.

निसर्गात घडणारी कोणतीही घटना स्वतंत्र नसते. ती अनेक अदृश्य प्रक्रियांची अंतिम अभिव्यक्ती असते. वादळ एखाद्या झाडाला कोसळण्यास कारणीभूत ठरू शकते, परंतु त्याच वादळात शेजारी उभे असलेले दुसरे झाड का टिकून राहिले, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. खरी कहाणी तिथूनच सुरू होते. कोसळलेले प्रत्येक झाड आपल्या आयुष्याचा एक दस्तऐवज आपल्या मागे ठेवून जाते. त्याची मुळे जमिनीच्या आरोग्याविषयी सांगतात. खोड वर्षानुवर्षे सहन केलेल्या ताणतणावाची नोंद ठेवते. फांद्या आणि पर्णसंभार प्रकाश, पाणी आणि वाढीच्या प्रवासाची साक्ष देतात. झाडाभोवतीची जमीन, जलनिस्सारण व्यवस्था, वाढलेले काँक्रीटीकरण, भूमिगत सुविधा, बदललेली भूवापर पद्धती आणि शहरी विकास या सर्वांचा त्याच्या आरोग्यावर कसा परिणाम झाला, याचे अनेक धागे त्या परिसरात विखुरलेले असतात. म्हणूनच कोसळलेले झाड ही केवळ एका झाडाची कथा नसते. ती त्या संपूर्ण परिसंस्थेची कहाणी असते, ज्या परिसंस्थेने त्या झाडाला वाढवले, घडवले किंवा कदाचित कमकुवत केले.

आजची शहरे झपाट्याने बदलत आहेत. हवामान बदलत आहे. अतिवृष्टीच्या घटना वाढत आहेत. भूमिगत पायाभूत सुविधा विस्तारत आहेत. जमिनीचा वापर बदलत आहे. या सर्व बदलांमध्ये झाडे केवळ जगत नाहीत; ती शहराला शुद्ध हवा, सावली, जैवविविधता, पावसाच्या पाण्याचे संवर्धन, तापमान नियंत्रण आणि मानसिक स्वास्थ्यही देत असतात. त्यामुळे झाडांचे आरोग्य आणि शहराचे आरोग्य हे वेगळे असूच शकत नाही. याच कारणामुळे प्रत्येक पर्यावरणीय घटना केवळ आपत्ती म्हणून नव्हे, तर शिकण्याची संधी म्हणूनही पाहणे आवश्यक आहे.

वैद्यकीय शास्त्रात ताप हा स्वतः रोग नसतो; तो शरीराने दिलेला इशारा असतो. योग्य निदानासाठी तो महत्त्वाचा पुरावा असतो. त्याचप्रमाणे कोसळलेले झाड हे फक्त हटवण्याचे काम नसून समजून घेण्याचा विषयही आहे. झाड हटवणे ही सार्वजनिक सुरक्षेची अपरिहार्य गरज आहे, परंतु त्याआधी निसर्गाने दिलेले पुरावे जतन करून त्यांचा अभ्यास करणे ही भविष्याची गुंतवणूक आहे.

निसर्ग आपल्याला नम्र राहायला शिकवतो. जितके आपण त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करतो, तितकेच आपल्या ज्ञानाच्या मर्यादा स्पष्ट होत जातात. निसर्ग आपल्याला सतत सांगत असतो की, अंतिम सत्याचा दावा करण्यापेक्षा शिकत राहणे अधिक महत्त्वाचे आहे. इतिहास साक्ष देतो की संकटांवर मात करणारे समाज महान असतात, पण संकटांतून शिकणारे समाज अधिक दूरदृष्टीचे ठरतात. प्रत्येक पूर, प्रत्येक वादळ, प्रत्येक पर्यावरणीय घटना ही केवळ नुकसानाची नोंद नसते. ती भविष्यासाठी निसर्गाने ठेवून दिलेली शिकवण असते.

जुलै २०२६मधील वादळांनंतर कोसळलेली झाडे आज हटवली गेली असतील, परंतु त्यांनी मागे ठेवलेले पुरावे हटवले जाऊ नयेत, कारण त्या पुराव्यांमध्येच अधिक सुरक्षित, अधिक संवेदनशील आणि अधिक शाश्वत शहरांच्या भविष्याची बीजे दडलेली आहेत. त्या पुराव्याचे वाचन कोण करणार? पहिल्या दृष्टिक्षेपात या प्रश्नाचे उत्तर सोपे वाटते. वैज्ञानिक संशोधन करतील, अभियंते तांत्रिक विश्लेषण करतील, प्रशासकीय अधिकारी निर्णय घेतील आणि नागरिक आपापल्या परिसरातील घडामोडींचे निरीक्षण करतील, परंतु निसर्ग जितका खोलवर समजून घेण्याचा प्रयत्न करतो, तितके एक सत्य अधिक स्पष्ट होत जाते.

कोणतेही जंगल एका वृक्षामुळे समृद्ध होत नाही. संपूर्ण परिसंस्था असंख्य परस्परसंबंधांवर उभी असते. मातीतील सूक्ष्मजीव मुळांना पोषण देतात. मुळे वृक्षाला स्थैर्य देतात. वृक्ष मातीचे संरक्षण करतात. पक्षी बीजांचे वहन करतात. कीटक परागीभवन घडवून आणतात. पाणी प्रत्येक सजीवाला जोडते, तर सूर्यप्रकाश जीवनचक्राला ऊर्जा देतो. खडक, खनिजे, वारा, पाऊस आणि हवामान यांसारखे निर्जीव घटकही तितकेच महत्त्वाचे असतात. सजीव आणि निर्जीव अशा प्रत्येक घटकाचे अस्तित्व इतरांच्या सहकार्यावर अवलंबून असते. मानवी समाजही या सार्वत्रिक नियमाला अपवाद नाही.

प्रशासकांकडे प्रशासनाचे ज्ञान असते. अभियंत्यांकडे संरचनात्मक समज असते. वनस्पतिशास्त्रज्ञ वनस्पतींच्या जीवनाचा अभ्यास करतात. मृदाशास्त्रज्ञ जमिनीखालील जग उलगडतात. हवामानतज्ज्ञ वातावरणातील बदलांचे विश्लेषण करतात. पर्यावरणतज्ज्ञ परस्परसंबंधांचा शोध घेतात. पत्रकार घटनांची समाजापर्यंत नोंद पोहचवतात. स्थानिक नागरिक आपल्या परिसराचा अनुभव वर्षानुवर्षे जपून ठेवतात. प्रत्येकाचे ज्ञान मौल्यवान असते, परंतु या सर्व ज्ञानाचा संगम झाल्यावरच समाजाची खरी बौद्धिक संपदा निर्माण होते. कदाचित हाच बुद्धिमत्तेचा खरा अर्थ असावा.

आज संपूर्ण जग AI म्हणजे Artificial Intelligence कृत्रिम बुद्धिमत्ता या अर्थाने ओळखते आणि ते योग्यही आहे. ही तंत्रज्ञानक्रांती माहितीचे विश्लेषण करण्याची, नमुने ओळखण्याची आणि प्रचंड प्रमाणातील माहितीवर प्रक्रिया करण्याची विलक्षण क्षमता मानवाला देत आहे, मात्र कृत्रिम बुद्धिमत्तेला पर्याय नसून तिचा मानवी विस्तार आहे.

याच विचारांतून Urban Forest Intelligence ही संकल्पना विकसित होत गेली. या नावात "Urban Forest" असले तरी ही कल्पना केवळ वृक्षांपुरती किंवा जंगलांपुरती मर्यादित नाही. ती शहरातील प्रत्येक सजीव आणि निर्जीव घटकांमधील परस्परसंबंध समजून घेण्याची एक सामूहिक विचारपद्धती आहे. तिच्या केंद्रस्थानी तंत्रज्ञान नसून माणूस आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता मोठ्या प्रमाणातील माहितीचे विश्लेषण करण्यास मदत करते, परंतु त्या विश्लेषणाचा अर्थ उलगडण्यासाठी अनुभव, संवेदनशीलता, स्थानिक ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक सहभाग यांची एकत्रित आवश्यकता असते. म्हणूनच या प्रवासात प्रत्येक नागरिक महत्त्वाचा आहे.

एका विद्यार्थ्याने टिपलेला फोटो, एखाद्या ज्येष्ठ नागरिकाने सांगितलेला परिसराचा इतिहास, माळ्याने केलेले दैनंदिन निरीक्षण, नागरिकांनी नोंदवलेले पाणी साचण्याचे बदलते स्वरूप, संशोधकांनी मांडलेली शास्त्रीय मते आणि प्रशासनाचा व्यावहारिक अनुभवहे सर्व पुरावे जेव्हा एकत्र येतात, तेव्हा शहर स्वतःच्या पर्यावरणाकडून शिकू लागते. ही केवळ नागरिकांच्या सहभागाची संकल्पना नाही. ही ज्ञानाच्या लोकशाहीची संकल्पना आहे.

निसर्गाने आपल्याला सहअस्तित्वाचा धडा लाखो वर्षांपूर्वी शिकवला आहे. कोणताही घटक स्वतःसाठी जगत नाही; प्रत्येक घटक इतरांच्या अस्तित्वाला पोषक ठरतो. हीच परस्परावलंबित्वाची शाश्वत व्यवस्था पृथ्वीवरील जीवनाला टिकवून ठेवते. मानवजातीसमोर आजची खरी संधी हीच आहेया निसर्गनियमातून शिकण्याची. आपण सर्व काही जाणतो, या समजुतीतून नव्हे; तर अजून बरेच काही शिकायचे आहे, या नम्र जाणीवेतून, कारण अंतिमतः प्रश्न असा नाही की आपल्या जवळ पुरेशी बुद्धिमत्ता आहे की नाही.

आपण पर्यावरणाकडे बहुधा घटना घडल्यानंतर लक्ष देतो. वृक्ष पडतो, पूर येतो, डोंगर खचतो, जलस्रोत आटतो; त्यानंतर आपण तातडीने उपाययोजना करतो, परिस्थिती पूर्ववत करतो आणि पुढे निघून जातो. ही कार्यपद्धती आवश्यक आहेच; परंतु ती प्रामुख्याने प्रतिक्रियात्मक आहे. निसर्ग आधी संकेत देतो आणि आपण त्याची दखल नंतर घेतो. जर आपण हे संकेत वेळेवर ओळखायला शिकलो, तर? कदाचित हीच Urban Forest Intelligenceची खरी ओळख आहे.

ती कोणतेही अंतिम उत्तर देत नाही. ती योग्य प्रश्न विचारायला शिकवते. ती परिपूर्णतेचा दावा करत नाही. ती परिपूर्णतेच्या दिशेने समाजाला एकत्र चालण्याची प्रेरणा देते आणि कदाचित, हाच निसर्गाने मानवाला दिलेला सर्वात मोठा संदेश आहे ज्ञानाचा प्रवास कधीच एकट्याचा नसतो; तो सहप्रवास असतो.

**-विजयकुमार कट्टी**



## बदलते तंत्रज्ञान

### सॅमसंगकडून फोल्डेबल्सची आठवी जनरेशन लाँच

सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने व्यक्तींच्या काम करण्याच्या, निर्मिती करण्याच्या आणि जोडलेले राहण्याच्या विविध गरजांनुसार डिझाइन केलेली तीन नवीन डिवाईसेस लाँच करत आपली आतापर्यंतची सर्वात संपूर्ण गॅलेक्सी झेड लाइनअप जाहीर केली आहे. या नवीन फोल्डेबल पोर्टफोलिओमध्ये गॅलेक्सी झेड फोल्ड८, गॅलेक्सी झेड फोल्ड८ अल्ट्रा आणि गॅलेक्सी झेड फ्लिप८ यांचा समावेश आहे.



नवीन गॅलेक्सी झेड सिरीज मोठ्या स्क्रीन, कव्हर डिस्प्ले आणि फ्लेक्सिबल डिझाइनसाठी विशेषतः तयार केलेल्या अनुभवांद्वारे गॅलेक्सी एआयला दैनंदिन जीवनाच्या अधिक जवळ आणते. पारदर्शकता, गोपनीयता आणि युझरचे पूर्ण नियंत्रण कायम ठेवत, कमी टप्प्यांत कामे पूर्ण करण्यासाठी ही एआय प्रणाली अधिक वैयक्तिक, सक्रिय आणि इतर डिवाईसेसशी कनेक्टेड बनवण्यात आली आहे.

नवीन फोल्डेबल डिवाईस दिवसभरात माहितीचा वापर करण्याच्या पद्धतीनुसार डिझाइन केलेला एक अनोखा अनुभव सादर करतो. याचा १०:१६ कव्हर डिस्प्ले मेसेजिंग, ब्राऊझिंग आणि शॉर्ट व्हिडिओंसाठी नैसर्गिक स्मार्टफोन अनुभव देतो, तर ४:३ मुख्य डिस्प्ले वाचन, गेमिंग, स्ट्रीमिंग आणि मल्टीटास्किंगसाठी एका मोठ्या कॅनव्हासमध्ये बदलतो, जे फिरवल्यावर लेख व ई-बुक्स वाचणे अधिक सोयीस्कर ठरते.

केवळ २०१ ग्रॅम वजन असलेला गॅलेक्सी झेड फोल्ड८ हा सॅमसंगचा आतापर्यंतचा सर्वात हलका गॅलेक्सी झेड फोल्ड आहे. या डिवाईसमध्ये गॅलेक्सी प्रोसेसरसाठी स्नॅपड्रॅगन ८ एलिट जनरेशन ५ आणि ४८०० एमएएच बॅटरी आहे, ज्यामुळे उत्तम कार्यक्षमता, डिवाईस दिवसभर कार्यरत राहण्याची खात्री मिळते.

सॅमसंगने नवीन फ्लेक्स टायटॅनियम तंत्रज्ञानाद्वारे डिस्प्ले अधिक पातळ आणि टिकाऊ बनवला असून, याच्या रचनेमुळे काळाच्या ओघात दिसणारी क्रिज कमी झाली आहे. हा डिस्प्ले ३००० नीट्सपर्यंतचा ब्राइटनेस, व्हिजन बूस्टर आणि बाहेरील प्रकाशात स्पष्ट दिसण्यासाठी कमी परावर्तन देणाऱ्या फिनिशिंगला सपोर्ट करतो. फोटोग्राफी आणि व्हिडीओसाठी, गॅलेक्सी झेड फोल्ड८मध्ये उत्कृष्ट इमेज क्वालिटीसाठी ड्युअल ५० मेगापिक्सल कॅमेरे दिले आहेत. यात एकाच वेळी प्रसंगाच्या दोन्ही बाजू टिपणारा 'ड्युअल रेकॉर्डिंग' आणि सोशल मीडियासाठी तयार व्हिडिओंकरिता विषयाचा आपोआप मागोवा घेऊन फुटेज पुन्हा फ्रेम करणारा 'माय फॅनकॅम' पर्याय उपलब्ध आहे.

# महान व्यक्तिमत्त्व डॉ. एपीजे अब्दुल कलाम

अब्दुल कलाम हे भारताचे अकरावे आणि पहिले गैर-राजकीय राष्ट्रपती होते, ज्यांना तंत्रज्ञान आणि विज्ञानातील त्यांच्या विशेष योगदानामुळे हे पद मिळाले. ते एक अभियंता आणि शास्त्रज्ञ होते. कलाम २००२-०७पर्यंत भारताचे राष्ट्रपतीही होते. त्यांनी जवळपास चार दशके वैज्ञानिक म्हणून काम केले आहे, ते अनेक प्रतिष्ठित संस्थांचे प्रशासकही राहिले.त्यांचा आज स्मृतिदिन. त्यानिमित्त घेतलेला आढावा...



## निमित्त

अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी धनुष्कोडी गावात रामेश्वरम (तामिळनाडू) येथे एका मच्छीमार कुटुंबात झाला. ते तमिळ मुस्लिम होते. त्यांचे पूर्ण नाव डॉ. अबुल पाकीर जैनउल्लाब्दीन अब्दुल कलाम, तर त्यांच्या वडिलांचे नाव जैनुलाब्दीन होते. ते एका मध्यमवर्गीय कुटुंबातील होते. वडील मच्छीमारांना बोट देऊन घर चालवत असत. बाल कलाम यांनाही त्यांच्या शिक्षणासाठी खूप संघर्ष करावा लागला. ते घरोघरी वर्तमानपत्रे वाटायचे आणि त्या पैशातून शाळेची फी भरायचे.

अब्दुल कलाम यांचे सुरुवातीचे शिक्षण रामेश्वरम प्राथमिक शाळेत झाले. १९५०मध्ये कलाम यांनी बीएससीची परीक्षा सेंट जोसेफ कॉलेज येथून पूर्ण केली. यानंतर त्यांनी १९५४-५७मध्ये मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी)मधून ॲरोनॉटिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा केला. लहानपणी फायटर पायलट होण्याचे त्यांचे स्वप्न होते, पण हे स्वप्न काळानुसार बदलले.

१९५८मध्ये कलाम हे डीटीडी आणि पी.मधील तांत्रिक केंद्रात वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून काम करू लागले. येथे राहून त्यांनी प्रोटोटाईप हॉवर क्राफ्टसाठी तयार केलेल्या वैज्ञानिक संघाचे नेतृत्व केले. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीला ते लष्करासाठी एक छोटे हेलिकॉप्टर डिझाइन केले होते. १९६२मध्ये त्यांनी संरक्षण संशोधन सोडून भारताच्या अंतराळ संशोधनात काम करायला सुरुवात केली. १९६२ ते ८२ या काळात त्यांनी या संशोधनाशी संबंधित अनेक पदे भूषवली. १९६९मध्ये कलाम भारताच्या पहिल्या एसएलव्ही-३ (रोहिणी)च्या वेळी इस्रोचे प्रकल्प प्रमुख बनले. १९९७मध्ये कलाम यांना विज्ञान आणि भारतीय संरक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी भारताचा सर्वोच्च सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात आला.

२००२मध्ये कलाम यांना भारतीय जनता पक्ष समर्थित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत उमेदवारी दिली, ज्याला सर्वांनी पाठिंबा दिला आणि १८ जुलै २००२ रोजी कलाम यांनी या पदाची शपथ घेतली. ते कधीच राजकारणाशी संबंधित नव्हते. तरीही ते भारताच्या सर्वोच्च राष्ट्रपती पदावर राहिले. जीवनात सुखसोयींचा अभाव असतानाही ते राष्ट्रपती पदापर्यंत कसे पोहचले ही गोष्ट आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

२७ जुलै २०१५ रोजी शिलाँगला एका कार्यक्रमादरम्यान अब्दुल कलाम साहेबांची तब्येत बिघडली होती, ते तिथल्या एका कॉलेजमध्ये मुलांना लेक्चर देत होते, तेवढ्यात अचानक ते पडले. त्यानंतर त्यांना शिलाँग येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर त्यांनी अखेरचा श्वास घेऊन जगाचा निरोप घेतला. (साभार : वेबदुनिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### रात्री की सकाळी? दूध पिण्याची योग्य वेळ कोणती?

दूध आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. दूध हे एक सुपरफूड आहे. दुधात भरपूर पोषक घटक असतात. ज्यामध्ये कॅल्शियम, प्रथिने आणि निरोगी चरबी यांसारखे आवश्यक बहु-पोषक घटक आढळतात. दूध प्यायल्याने हाडे मजबूत होतात. याशिवाय स्नायू ही मजबूत होतात, शरीर सक्रिय राहते आणि मनही तीक्ष्ण होते. व्हिटॅमिन डी मेंदूचे कार्य सुधारते. पण असं असताना अनेकांच्या मनात हा प्रश्न येतो की ते सकाळी रिकाम्या पोटी दूध पिऊ शकतात का? चला तर मग जाणून घेऊया दूध पिण्याची योग्य वेळ कोणती? तुम्ही सकाळी दूध प्यावे की रात्री ही तुमची वैयक्तिक निवड असू शकते. पण सकाळी रिकाम्या पोटी दूध पिणे हे व्यक्तीच्या आरोग्याच्या स्थितीवर आणि दुधाच्या प्रकारावरदेखील अवलंबून असते.



**सकाळी दूध पिण्याचे फायदे**

सकाळी दूध प्यायल्याने तुमची पचनक्रिया सुधारते. सकाळी दूध प्यायल्याने कमकुवत हाडांना जीवदान मिळते आणि स्नायू मजबूत होतात. ज्यांना वजन वाढवायचे आहे त्यांनी सकाळी दूध जरूर प्यावे.

**सकाळी दूध पिण्याचे तोटे**

काही लोकांना दुधापासून लॅक्टोजची समस्या असू शकते, ज्यामुळे पोटदुखी, अतिसार किंवा गॅस होऊ शकतो. रिकाम्या पोटी दूध प्यायल्याने सिडीटी किंवा पोटात जळजळ होऊ शकते. ज्या लोकांना रिकाम्या पोटी दूध प्यायचे आहे त्यांनी गरम दुधाऐवजी थंड दूध प्यावे जेणेकरुन पचनसंस्था आणि सिडिटीशी संबंधित समस्या उद्भवणार नाहीत.

**दूध पिण्याची योग्य वेळ आणि पद्धत कोणती?**

तुम्ही सकाळी दूध पिऊ शकता पण ते पिण्यापूर्वी काही फळे किंवा नाश्ता करा. दूध कधीही रिकाम्या पोटी पिऊ नका, ते जेवणासोबत प्या. कमी चरबीयुक्त किंवा स्किम्ड दूध पिणे चांगले आहे, विशेषतः जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल किंवा हृदयाच्या आरोग्याची काळजी असेल. रात्री झोपण्यापूर्वी दूध पिणे देखील फायदेशीर ठरू शकते, कारण यामुळे झोप सुधारण्यास मदत होते. तसेच गरम दूध हळद मिसळून प्या.

# आषाढी म्हणजे विठ्ठलाच्या चरणी लीन होण्याचा दिवस

## खासदार सुनील तटकरे यांचे प्रतिपादन

**रोहा : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने रोहा येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात आयोजित कार्यक्रमात खासदार सुनील तटकरे यांनी सहभाग घेतला. यावेळी बोलताना ते म्हणाले, "विठ्ठल म्हणजे परमोच्च बिंदू आहे. विठ्ठलाची भक्ती ही अंतकरणातून होते. आषाढी एकादशीला भक्ती आणि भावनांचा सुरेख संगम दिसून येतो. आज मी खासदार म्हणून नाही तर विठ्ठल भक्त म्हणून आलो आहे." जगतगुरु तुकोबारायांनी माणसाच्या



मनातील तळमळ आणि भावना जगाशी एकरूप कशा व्हाव्यात याबद्दल विचार दिले आहेत, असेही त्यांनी सांगितले. आषाढी एकादशी हा विठ्ठलाच्या चरणी लीन होण्याचा दिवस असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला नगराध्यक्षा वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, विठ्ठल रखुमाई मंदिर ट्रस्ट रोहाचे अध्यक्ष सुभाष राजे, उपाध्यक्ष आनंद कुळकर्णी, खजिनदार प्रफुल ताम्हाणे यांच्यासह नगरपरिषदेचे सभापती, उपसभापती, नगरसेवक आणि मोठ्या संख्येने विठ्ठल भक्त उपस्थित होते. यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते महाराष्ट्र भूषण ह.भ.प. मयुरेश माधव केळकर (पुणे) यांचा सन्मान करण्यात आला. मंदिरात सकाळपासूनच विठ्ठल दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. विठ्ठल रखुमाई मंदिर ट्रस्टच्या वतीने दर्शनासाठी चांगली व्यवस्था करण्यात आली होती.

## जावळी हायस्कूलच्या प्रवेशद्वाराचे भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील शैक्षणिक संस्थांपैकी एक नामांकित शिक्षण संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळाच्या तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी इंग्लिश स्कूल जावळी हायस्कूलच्या खा. सुनील तटकरे प्रवेशद्वाराचे भूमिपूजन रविवार (दि. २६) माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक आनंद यादव यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

जावळी हायस्कूलच्या प्रगतीबाबत व दरवर्षी हायकुलचा दहावी शाळांत परीक्षेचा लागणारा नेत्रदीपक निकाल याबाबत आनंद यादव यांनी मनोगतातून समाधान व्यक्त करीत संस्था चालक, हायस्कूलचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वर्ग यांचे खास अभिनंदन केले. हायस्कूल प्रवेशद्वाराच्या या भूमिपूजन सोहळ्यास संस्थेचे पदाधिकारी सुभाष केकाणे, माणगाव नगरीचे माजी उपनगराध्यक्ष संदिप खरगटे, जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष शादाब गैबी, उणेगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजेंद्र शिर्के आदी उपस्थित होते.



## कर्जत येथील शिबिरात ३८ जणांनी केले रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कपालेश्वर देवस्थान समिती आणि शिवतांडव प्रतिष्ठान ढोलताशा ध्वज पथक कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत येथील कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात ३८ रक्तदात्यांनी सहभाग घेत रक्तदान केले.



कर्जत-खालापूर तालुक्यातील सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे ५४३ वे रक्तदान शिबिर ठरले. शिबिराचे उद्घाटन राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक भालचंद्र जोशी, आशिष गोखले, संदीप भोईर, विवेक भागवत, अभिजीत मराठे, निलेश परदेशी, सदानंद जोशी, मंदार लेले, रोनक कोठारी, रघुनाथ खैरे, बंटी लोवंशी, सर्वेश गोगटे, नमित दांडेकर, नारायण भोईर, रोहित कानडे, रितेश जाधव, निहार व्यापारी उपस्थित होते.

माजी नगरसेवक निलेश हरिश्चंद्रे यांनी रक्तदानाचा शुभारंभ केला. अॅड. योगेश देशमुख यांनी आयुष्यातील ५२वे रक्तदान केले. यावेळी महेंद्र बोडके, दिनेश जैन, पुंडलिक भोईर, पंकज पाटील, राज पाटील, विशाल बारिया, साहिल गोरे, मिलिंद लाड, जयवंत म्हसे, अमीर माणियार आदी उपस्थित होते.



**रोहा : आषाढी एकादशीनिमित्त येथे काढण्यात आलेल्या दिंडीचे स्वागत नगराध्यक्ष वनश्री शेडगे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, सभापती राजेंद्र जैन, नगर परिषद सभापती, नगरसेवक यांनी केले. यावेळी हभप शेळके महाराज तसेच अन्य वारकरी उपस्थित होते.**

## मुरूडच्या आयेशा पुरकरचे एआय-डेटा सायन्समध्ये यश

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील लक्ष्मीखार येथील शहबाज पुरकर यांची मुलगी आयेशा शहबाज पुरकर हिने कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स या आधुनिक शाखेत ९७ टक्के गुण मिळवत अभिमानास्पद यश संपादन केले आहे. पुणे विद्यापीठांतर्गत अजिंक्य डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे बी.ई. आयर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्सची विद्यार्थिनी असलेल्या आयेशाच्या या कामगिरीमुळे महाविद्यालयासह मुरुड शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



आयेशाने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि जिद्दीच्या जोरावर हे यश मिळवले. अत्यंत स्पर्धात्मक असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स या क्षेत्रात तिने मिळवले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या कामगिरीबद्दल प्राचार्य, प्राध्यापक, पालक, नातेवाईक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले आहे.

## कोनायन्सस शाळेची भक्तिमय दिंडी ; बाळगोपाळांचा उत्साह

**पेण : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त पेण येथील कोनायन्सस इंग्लिश मिडियम स्कूलच्या वतीने शाळेपासून चावडी नाका येथील गणपती मंदिरापर्यंत भव्य प्रतिकात्मक दिंडीचे आयोजन करण्यात आले. इंग्लिश मिडियम शाळा असूनही महाराष्ट्राच्या संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्यात कोनायन्सस स्कूल नेहमीच आघाडीवर असल्याचे या दिंडीतून पुन्हा दिसून आले.

सकाळपासूनच शाळेच्या परिसरात दिंडीची लगबग सुरू होती. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत मुक्ताई, संत गाडगे महाराज, साईबाबा यांसह विविध संत-महात्म्यांच्या वेशभूषेत सजले बाळगोपाळ दिंडीत सहभागी झाले होते. त्यामुळे दिंडीला आगळेवेगळे आकर्षक स्वरूप प्राप्त झाले. दिंडीच्या वेळी वरुणराजानेही हजेरी लावली. मात्र पावसाची तमा न बाळगता विद्यार्थ्यांनी उत्साह कायम ठेवला.

ढोल-ताशांच्या आणि भक्तिमय वातावरणात बाळगोपाळांनी मनमुराद नृत्य केले. शिक्षकवर्गही विद्यार्थ्यांसोबत सहभागी झाल्याने वातावरण अधिकच जल्लोषमय झाले.चावडी नाका येथील गणपती मंदिरात दिंडीचे स्वागत पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील आणि नगरसेविका अंजली जोगळेकर यांनी केले. दिंडीमध्ये शाळेचे संचालक अध्यक्ष डॉ. मनीष वनगे, उपाध्यक्ष अॅड. मंगेश नेने, सचिव डॉ. सोनाली वनगे, सदस्य प्रकाश गुरव, नगरसेवक भूषण कडू, नगरसेवक मितेश शहा, मुख्याध्यापिका जेमीना शिरपुरवाला, सुप्रिया वेखंडकर यांच्यासह शिक्षकवृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.



## जेएसएस रायगडद्वारे आरी वर्क हस्तकला कार्यशाळा

**खालापूर : प्रतिनिधी**

जन शिक्षण संस्थान रायगडच्या वतीने रविवारी (दि. २६) विणेगाव-खालापूर येथे आरी वर्क हस्तकला कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यासोबतच उपस्थितांना कापडी पिशव्यांचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना स्वच्छतेची शपथ देण्यात आली आणि प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला बचतगट सीआरपी पूजा गरुडे, प्रशिक्षिका स्वप्नाली म्हात्रे, सिद्धी साळुंके आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली जे.एस.एस रायगड १५ जुलै ते ३१ जुलैदरम्यान स्वच्छता पंधरवडा अंतर्गत जिल्हाभरात जनजागृती कार्यक्रम



राबवत आहे. 'कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार'च्या पुढाकाराने गेल्या २० वर्षांत रायगड जिल्ह्यात ८० हजारांहून अधिक लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे, अशी माहिती डॉ. कोकणे यांनी दिली.

## सावळे येथे दिंडी प्रदक्षिणा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी सावळे गावातील वारकरी सांप्रदायाच्या वतीने आषाढी एकादशीच्या पावन दिनी गावातील विठ्ठल मंदिरात विठू नामाचा गजर करत गावातील विठ्ठल मंदिरातून दिंडी संपूर्ण गावात मार्गक्रमण करत विठूरायाचा जयघोष करत टाळ, मृदुंग आवाजावर गावातून दिंडी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी महिलांनी आपल्या डोक्यावर तुळशी वृंदावन घेतले होते.

## 'पारिजात'च्या उपक्रमातून साहित्याचे वाटप

**तळा : प्रतिनिधी**

ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी पारिजात मुंबई संस्थेच्या 'Back to School' उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गणेशनगर येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन-पेन्सिल आदी साहित्य असलेले किट वाटण्यात आले. यासोबतच पर्यावरण रक्षणाच्या उद्देशाने शालेय परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. याप्रसंगी रिचा शिंदे, वैभव कदम, अंकुश कदम, प्रशांत पाटणे, विशाल कदम, महादेव दुर्गावले, प्रमिला चव्हाण, मुस्तफा शेख, बाळू मगर, अमरजित खोसे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, पारिजात संस्थेने दिलेल्या शैक्षणिक साहित्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळेल आणि शाळेच्या प्रगतीला हातभार लागेल.

# मोहोपाडा येथील गीध कुटुंबाचा शतकभराचा कलावारसा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पुठ्याचा लगदा आणि शाडूची माती एकत्र करून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याचे काम शिवनगर, मोहोपाडा येथील गीध कुटुंबीय करीत आहेत. शाडूच्या मातीच्या मूर्तीपेक्षा वजनाने हलक्या असणाऱ्या या गणेशमूर्तींना सध्या बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

गेली अनेक वर्षे शाडू मातीच्या मूर्ती घडवणाऱ्या वैभव पुरुषोत्तम गीध यांनी मागील वर्षी पुठ्याचा लगदा आणि शाडूची माती एकत्र करून प्रथम स्वतःसाठी एक गणेशमूर्ती बनवली होती. तिचे फिनिशिंग, वजनाचा हलकेपणा आणि टिकाऊपणा यामुळे त्यांनी यावर्षी ग्राहकांनाही अशाच मूर्ती देण्याचे ठरवले. त्यांच्या या उपक्रमाला भाविकांनी प्रचंड दाद दिली असून चक्क ७५० गणेशभक्तांनी त्यांच्याकडून या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बुक केल्या आहेत. आकर्षक मूर्ती,त्यावर केलेले चांगले रंगकाम आणि डोळ्यांची सुंदर आखणी यामुळे त्यांच्या गणेशमूर्तींना रसायनीसह पनवेल, पेण, कर्जत, खोपोली आणि मुंबईत जोरदार मागणी आहे.



काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले आणि बाजारपेठही बदलली; पण खालापूर तालुक्यातील मोहोपाडा येथील गीध कुटुंबीयांनी शतकभरापासून जोपासलेली गणेशमूर्ती घडविण्याची परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने, निष्ठेने आणि कलात्मकतेने जिवंत ठेवली आहे. शाडूची माती आणि पुठ्याच्या लगद्यापासून साकारलेल्या त्यांच्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती आज गणेशभक्तांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत. या कलेची मुहूर्तमेढ स्वर्गीय यशवंत विठ्ठल गीध यांनी रोवली. त्यांनी सुरू केलेला हा वडिलोपार्जित वारसा आज त्यांचे पुत्र पुरुषोत्तम गीध आणि त्यानंतर वैभव पुरुषोत्तम गीध समर्थपणे पुढे नेत आहेत. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षांपासून वडिलांच्या सानिध्यात गणेशमूर्ती घडविण्याचे धडे घेतलेल्या पुरुषोत्तम गीध यांनी आज वयाच्या ७५व्या वर्षीही त्याच जिद्दीने आणि उत्साहाने ही कला जपली आहे.

विशेष म्हणजे त्यांनी ठाणे येथील विनय इंजिनिअरिंग कंपनीत तब्बल १४ वर्षे नोकरी केली, मात्र वडिलांनी जोपासलेला कलावारसा लुप्त होऊ नये, ही भावना मनात ठेवून त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि स्वतःला पूर्णपणे गणेशमूर्ती निर्मितीसाठी समर्पित केले. आज त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यात त्यांना पत्नी पल्लवी गीध यांची मोलाची साथ लाभते. मुलगा सचिन गीध आकर्षक रंगकाम करून मूर्तींना जिवंतपणा देतो, तर वैभव गीध मूर्तींची रचना, आखणी आणि अंतिम स्वरूप घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे गणेशमूर्ती निर्मिती हा केवळ व्यवसाय नसून गीध कुटुंबासाठी तो श्रद्धा, संस्कार आणि कलेचा वारसा बनला आहे. दसऱ्यापासून गणेशमूर्ती घडविण्याचे काम सुरू होते. ६० टक्के शाडू माती व ४० टक्के पुठ्ठ्याच्या लगद्याचा वापर करून मूर्ती पूर्णपणे हाताने तयार केल्या जातात.



# समझौता एक्स्प्रेस ते मक्का मशीद






**स्मिता प्रकाश :** हे सर्व सुरू असताना केंद्रीय गृहमंत्रालय काय करत होते? एका कार्यरत लष्करी अधिकाऱ्यावर 'थर्ड डिग्री' वापरली जात आहे, साध्वी प्रज्ञा यांची चौकशी सुरू आहे अशा फायली किमान संयुक्त सचिवांच्या स्तरापर्यंत तरी पोहोचल्या असतील?

**आर.व्ही.एस. मणी :** होय, त्या फायली वरिष्ठ स्तरापर्यंत पोहचल्या होत्या. आम्हाला सांगण्यात आले की, लष्करप्रमुख जनरल दीपक कपूर यांच्याशी चर्चा झाली आहे आणि पुढील कारवाई संरक्षण मंत्रालय करेल. यानंतर ती फाईल गृहमंत्रालयातून बाजूला करण्यात आली. आम्हाला स्पष्ट सूचना देण्यात आल्या की, या विषयावर स्वतंत्र फाईल संरक्षण मंत्रालयाकडे आहे आणि पुढील सर्व कारवाई तेच करतील. आम्हाला ती फाईल बंद करण्यास सांगण्यात आले. दुसरे कारण असे सांगण्यात आले की, गुन्ह्याचा तपास हा राज्य सरकारचा विषय आहे.

केंद्र सरकार थेट हस्तक्षेप करणार नाही, कारण यात लष्करातील अधिकारी संबंधित होते. त्यामुळे संरक्षण मंत्रालयच हा विषय हाताळेल. ही दोन वाक्ये आम्हाला अधिकृतरीत्या सांगण्यात आली. त्यानंतर ती फाईल गृहमंत्रालय आणि संरक्षण मंत्रालय यांच्यात फिरत राहिली. शेवटी ती नेमकी कुणाकडे होती हे आम्हालाही समजले नाही.

**स्मिता प्रकाश :** तुम्हाला माहिती आहे का, शेवटी ती फाईल लष्कराकडे होती की, संरक्षण मंत्रालयाकडे?

**आर.व्ही.एस. मणी :** ती संरक्षण मंत्रालयाकडे होती. मी संबंधित अधिकाऱ्यांची नावे घेणार नाही, पण संरक्षण मंत्रालयातील एका महिला अधिकाऱ्याने मला सांगितले होते की, 'अरे छोडो ना... फौजी हॅण्डल कर लेंगे.. आप क्यो इतका संकोच कर रहें हो? मी माझ्या पुस्तकात याचा उल्लेख केला आहे की, तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील प्रत्यक्ष निर्णय घेत नव्हते. दिग्विजय सिंह गृहखाते चालवत होते.

**स्मिता प्रकाश :** तुम्ही असेही लिहिले आहे की, दिग्विजय सिंह यांच्यासाठी मंत्रालयात स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती.

**आर.व्ही.एस. मणी :** होय, ते शिवराज पाटील यांच्या कार्यालयात बसत असत. शिवराज पाटील अधिकृत खुर्चीवर बसत, पण खोलीतील सोफ्यावर दिग्विजय सिंह बसलेले असत. आम्ही अधिकारी मंत्रालयात एखाद्या कामासाठी गेलो की, शिवराज पाटील फक्त हाताने त्यांच्याकडे इशारा करत. त्यानंतर पुढील सूचना दिग्विजय सिंह देत असत.

**स्मिता प्रकाश :** साध्वी प्रज्ञा यांनाच लक्ष्य का करण्यात आले, असे तुम्हाला वाटते?

**आर.व्ही.एस. मणी :** माझ्याकडे त्याचे उत्तर नाही. नेमके त्यांनाच का निवडले हे मला माहीत नाही. काही लोकांना तर बनावट नावांच्या आधारेही उचलण्यात आले होते. त्याबाबतही आमच्याकडे कोणतीही माहिती नव्हती.

**स्मिता प्रकाश :** पण नंतर कर्नल पुरोहित यांची निर्दोष मुक्तता झाली. त्या काळात त्यांच्यासाठी उघडपणे आवाज उठवणारे कोणी होते का?

**आर.व्ही.एस. मणी :** मी स्वतः होतो. मी २०१८पासून सातत्याने उघडपणे बोलत आलो आहे. पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वीही मी या प्रकरणावर बोलत होतो. कर्नल पुरोहित यांचे वकील माझ्याशी संपर्कात होते. आम्ही अनेकजण त्यांच्यासाठी उठवत होतो. नंतर त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्त झाली. आम्ही सर्वोच्च न्यायालयातही काही याचिका दाखल करण्याचा प्रयत्न केला. हरीश साळवे यांनीही काही अर्ज दाखल केले, परंतु सर्वोच्च न्यायालयाने त्यांना मान्यता दिली नाही. तो काळ सप्टेंबर–ऑक्टोबर २०१८चा होता.

**स्मिता प्रकाश :** 'हिंदू दहशतवाद' हा शब्दप्रयोग तुम्ही प्रथम कधी ऐकला?

**आर.व्ही.एस. मणी :** अधिकृत नोंदींमध्ये तर कधीच नाही, पण काही संकेत आधीपासून दिसत होते. '२६/११'च्या आधी काही घटना घडल्या होत्या. उदाहरणार्थ डुमरियागंज येथील येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत बनावट नोटांचे मोठे रॅकेट उघडकीस आले होते. डुमरियागंज हे नेपाळ सीमेच्या जवळ असल्यामुळे पाकिस्तानमधून नेपाळमार्गे बनावट नोटा भारतात आणल्या जात असल्याची माहिती आमच्याकडे होती. त्या काळात काही ठिकाणी 'हिंदू दहशतवाद' असा शब्द कानावर पडत होता, पण प्रत्यक्षात अशा प्रकारचा कोणताही अधिकृत पुरावा नव्हता, मात्र '२६/११' पूर्वी काही घटना घडत होत्या. मालेगाव प्रकरण घडले होते. आम्ही सातत्याने सांगत होतो की, त्यामागे 'अहल–ए– हदीस'चा हात आहे. त्याच काळात कर्नल पुरोहित यांना अटक झाली. एकदा लखनौमधील एका साहाय्यक सॉलिसिटर जनरलने स्पष्टपणे सांगितले की, 'हिंदू दहशतवाद' असे काही अस्तित्वातच नाही.

गृहमंत्रालयाच्या अंतर्गत सुरक्षा विभागाच्या अधिकृत नोंदींमध्ये अशा प्रकारचा एकही उल्लेख नव्हता. १ जून २००६ रोजी दिग्विजय सिंह यांनी मला 'हिंदू दहशतवादाशी संबंधित प्रकरणांची माहिती शोधण्यास सांगितले. मी त्यांना स्पष्ट उत्तर दिले की, अशा प्रकारची एकही केस उपलब्ध नाही. त्यावेळी आणखी एक पोलीस अधिकारी दिग्विजय सिंह यांच्यासोबत बसले होते. '२६/११'नंतर मी त्यांची ओळख हेमंत करकरे म्हणून पटवली.

**स्मिता प्रकाश :** तुम्ही पाकिस्तानचा उल्लेख केला. त्याचा नेमका संदर्भ काय होता?

**आर.व्ही.एस. मणी :** ३० आणि ३१ मे २००६ रोजी भारतीय गृहसचिव आणि त्यांचे शिष्टमंडळ पाकिस्तानमध्ये गेले होते. त्या काळात भारत आणि पाकिस्तान यांच्या गृहस्तरावरील चर्चा सुरू होती. त्यांच्या परतीच्या एक दिवस आधी म्हणजे १ जून रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर हल्ला झाला. त्या हल्ल्यात मोठे नुकसान झाले नाही, पण हल्ला झाला हे सत्य आहे. याच काळात दिग्विजय सिंह गृहमंत्रालयाच्या कार्यालयात बसून मला 'हिंदू दहशतवाद' प्रकरणे शोधण्याचे निर्देश देत होते.

**स्मिता प्रकाश :** म्हणजे तुमच्या मते इस्लामाबादमधील त्या बैठकीनंतर 'हिंदू दहशतवाद' ही संकल्पना पुढे आणण्यात आली?

**आर.व्ही.एस. मणी :** नाही, मी तसे म्हणत नाही. मी एवढेच सांगतो की, ते पाकिस्तानमध्ये गेले होते. संघाच्या मुख्यालयावरील हल्ल्यानंतर काँग्रेसने एका वाचनात्मक भूमिका उभी करण्याचा प्रयत्न केला. त्यांना संघावरील हल्ल्याचा राजकीय फायदा विरोधी पक्षाला मिळू द्यायचा नव्हता. त्यामुळे 'केवळ मुस्लीमच दहशतवादी नसतात, हिंदूही दहशतवादी असू शकतात' असा संदेश देण्याचा प्रयत्न होता. ते सतत असेच म्हणत असत की, 'दहशतवादाला धर्म नसतो. मग सर्व दहशतवादी मुस्लीमच का असतील? हिंदूही दहशतवादी असू शकतात' याच विचाराला पुढे 'हिंदू दहशतवाद' या कथानकाचे स्वरूप देण्यात आले.

**स्मिता प्रकाश :** पण एखादा राजकारणी विशेषतः गृहमंत्री, नोकरशाहीकडून (Bureaucracy) काही पुरावे मिळाल्याशिवाय असा शब्द वापरणार नाही.

**आर.व्ही.एस. मणी :** मी तुम्हाला एक गोष्ट स्पष्ट सांगतो. २०१०पर्यंत मी गृह मंत्रालयाच्या अंतर्गत सुरक्षा विभागात कार्यरत होतो. त्या काळात मंत्रालयाच्या कोणत्याही अधिकृत फाईलमध्ये 'हिंदू दहशतवाद' हा शब्द नव्हता. अशा प्रकारचा उल्लेख कोणत्याही फाईलमध्ये करण्यात आलेला नव्हता. माझी बदली झाल्यानंतर संयुक्त सचिव डी. टी. विलास यांचीही बदली झाली. त्यांनी या भूमिकेला विरोध केला होता. यानंतर दुसरे संचालक रुजू झाले. त्यानंतर एका संयुक्त सचिवांनी, गुप्तचर विभागाकडून (IB) कोणताही अहवाल किंवा माहिती उपलब्ध नसताना एका फाईलवर सहजपणे अशी नोंद केली की, 'हिंदू दहशतवादाशी संबंधित काही प्रकरणे असल्याचे दिसते. त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.' याच नोंदीमुळे गृह मंत्रालयाच्या फाईलमध्ये प्रथमच 'हिंदू दहशतवाद' हा शब्द आला.

या संदर्भातील माहिती नंतर माहितीच्या अधिकार (RTI) कायद्यांतर्गत बाहेर आली. त्यावेळी राहुल शिवशंकर यांनी 'न्यूजएक्स' या वृत्तवाहिनीवर ही माहिती प्रसिद्ध केली होती. २०१०मधील त्या नोंदीत गुप्तचर विभागाचा कोणताही अहवाल नव्हता, कोणताही ठोस पुरावाही नव्हता. तरीही केवळ एका अधिकाऱ्याच्या निरीक्षणामुळे हा शब्द अधिकृत फाईलमध्ये समाविष्ट झाला. यापूर्वीही हा शब्द आणण्याचे अनेक प्रयत्न झाले होते, मात्र आमच्या संपूर्ण टीमने त्याला विरोध केला होता, कारण आमचे स्पष्ट मत होते की, उपलब्ध पुराव्यांमध्ये अशा त्या काळात ठामपणे प्रकारच्या निष्कर्षाला आधार नव्हता. 'समझौता एक्स्प्रेस' बॉम्बस्फोटाच्या प्रकरणातही हेच झाले. माझ्या मते ते पूर्णपणे टाळता आले असते.

**स्मिता प्रकाश :** कसे? त्याबद्दल सविस्तर सांगा.

**आर.व्ही.एस. मणी :** मी याविषयी 'Deception' नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. ते काल्पनिक (फिक्शन) स्वरूपात आहे. कारण काही गोष्टी त्यावेळी थेट अधिकृत स्वरूपात मांडणे शक्य नव्हते. म्हणून मी त्या घटनांना कादंबरीच्या माध्यमातून मांडले. ते पुस्तक वाचल्यास तुम्हाला समजेल की, मक्का मशीद बॉम्बस्फोट, 'समझौता एक्स्प्रेस' बॉम्बस्फोट, उत्तर प्रदेशातील न्यायालयांमधील स्फोट हे अनेक हल्ले टाळता आले असते.

जर तपास यंत्रणांनी 'अहल–ए–हदीस' आणि इतर जिहादी संघटनांवर लक्ष केंद्रित केले असते, तर परिस्थिती वेगळी असती. **(क्रमशः)**

# नवी मुंबईतील २१ विठ्ठल मंदिरांत हिवताप-डेंग्यूबाबत जनजागृती

## ११ हजारांहून अधिक भाविकांना मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात हिवताप आणि डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी व्यापक उपाययोजना राबवण्यात येत आहेत. आषाढी एकादशीनिमित्त मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येणार असल्याने शहरातील २१ विठ्ठल मंदिरांमध्ये विशेष जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत ही शिबिरे घेण्यात आली.

कुकशेत येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात आयोजित शिबिराला महापौर सुजाता पाटील यांनी भेट देऊन प्रदर्शनाची पाहणी केली. आरोग्य विभागाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.महापालिका क्षेत्रातील विविध विभागांतील २१ विठ्ठल मंदिरांमध्ये झालेल्या या शिबिरांमध्ये एकूण ११,२०९ भाविकांमध्ये हिवताप आणि डेंग्यूबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी ४५ भाविकांचे रक्तनमुने तपासणीसाठी घेण्यात आले. शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे ॲनॉफिलीस आणि एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्ष दाखवून त्यांच्या अळ्यांबाबत माहिती देण्यात आली.



घराभोवती आणि घरात डासोत्पत्ती होऊ नये यासाठी पाणी साठवले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीने झाकून ठेवणे, पाण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे, आठवड्यातून एक दिवस त्या स्वच्छ करून कोरड्या ठेवणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गच्चीवर आणि घराभोवती पडले भंगार, टायर्स, प्लास्टिक शीट, ताडपत्री यांमध्ये पाणी साचू न देण्याचे आवाहन करण्यात आले.

ताप आल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही सांगण्यात आले. हिवताप–डेंग्यू प्रतिबंधासाठी नागरिकांनी घर आणि परिसर स्वच्छ ठेवावा, उघड्यावर पडले टाकाऊ साहित्य नष्ट करावे आणि डासोत्पत्ती स्थाने नष्ट करण्यात सक्रिय सहभाग द्यावा, असे आवाहन महापौर सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कडधान्य प्रक्रिया युनिटसाठी २५ लाखांपर्यंत अनुदान; अर्ज प्रक्रिया सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि काढणीपश्चात पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने 'सन २०२६–२७ कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' सुरू केले आहे. या अभियानांतर्गत कडधान्य प्रक्रिया युनिट स्थापन करण्यासाठी इच्छुक पात्र व्यक्ती आणि संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रक्रिया युनिटसाठी प्रति युनिट २५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक साह्य दिले जाणार आहे.

कडधान्य मूल्यसाखळी अधिक सक्षम करण्याच्या हेतूने ही योजना राबवली जात आहे. या योजनेचा लाभ शेतकरी उत्पादक संस्था, क्लस्टर स्तर महासंघ, प्राथमिक कृषी पतसंस्था, वैयक्तिक अर्जदार, उद्योजक तसेच कोणत्याही अधिनियमांतर्गत नोंदणीकृत उपक्रमांना घेता येईल. पात्रतेच्या निकषांनुसार गट लाभार्थी संस्था किमान मागील दोन वर्षांपासून विधिवत नोंदणीकृत आणि कार्यरत असावी. वैयक्तिक अर्जदाराचे वय



किमान २१ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. एका कुटुंबातील स्वतः, पती–पत्नी व अविवाहित मुले यापैकी केवळ एकालाच या आर्थिक साह्याचा लाभ मिळेल.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, डोंगराळ क्षेत्रे आणि आकांक्षी तालुके येथील अर्जदारांना विशेष प्राधान्य दिले जाईल. योजनेतील अर्थसाह्याबाबत प्रकल्प खर्चाच्या तीन टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये प्रति युनिट यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान मंजूर केले जाईल. हे अनुदान प्रामुख्याने यंत्रसामग्री खरेदी तसेच इमारत, गोदाम आणि साठवण पायाभूत सुविधांसाठी दिले जाईल. मात्र इमारत व गोदाम बांधकामासाठीचे अनुदान हे एकूण पात्र अनुदानाच्या जास्तीत जास्त ३० टक्क्यांपर्यंतच मर्यादित राहील.

जमीन, वीज आणि मनुष्यबळावरील खर्चासाठी अनुदान देय नाही. प्रकल्पासाठी आवश्यक एकूण खर्चापैकी किमान १५ टक्के रक्कम आणि कार्यभांडवलासाठी लागणारा मार्जिन मनी अर्जदाराला स्वतः उभारावा लागेल. योजनेतील उर्वरित रक्कम अर्जदाराने मार्जिन मनी किंवा बँक कर्जाद्वारे उभारणे बंधनकारक आहे. कडधान्य क्षेत्रात प्रक्रिया उद्योग उभारून स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उद्योजक आणि संस्थांसाठी ही महत्त्वाची संधी आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते छत्रीवाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या दिवसात ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी घेत व सामाजिक बांधिलकी जपत श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व गौरव सेवा ट्रस्टच्या माध्यमातून आमदार मंदा म्हात्रे यांनी स्वामी समर्थांचे दर्शन घेत २३ जुलै रोजी जुईनगर येथील श्री स्वामी समर्थ मठ येथे ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप केले.

याचा लाभ जुईनगर आणि नेरूळ परिसरातील भाविक भक्त–ज्येष्ठ नागरिक यांनी घेतला. यावेळी श्री स्वामी समर्थ मठाचे संस्थापक अध्यक्ष संतोष सुतार, सचिव प्रदिप पाटील, मठाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच भाविक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# स्व. अश्विन पाटील मित्र परिवारातर्फे रक्तदान शिबिर

**उरण : बातमीदार**

उरणचे उत्तम खेळाडू स्व. अश्विन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत अश्विन पाटील मित्र परिवाराच्या माध्यमातून श्री साई ब्लड बँक, पनवेल यांच्या सौजन्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबिर गुरुवार दि. ३० जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल, उरण शहर येथे होणार आहे.

रक्ताचा आहे थेंब थेंब मौल्यवान, याची असावी सर्वांना जाण; म्हणूनच करावे रक्तदान, या सामाजिक संदेशातून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# 'केबीपी'मध्ये कारगिल विजय दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये कारगिल विजय दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला निवृत्त कर्नल नरेशकुमार गोयल, सिनेअभिनेते मुकेश ऋषी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक होत्या.

१९९९च्या कारगिल युद्धात आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांना यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत आदरांजली वाहण्यात आली. यावेळी निवृत्त कर्नल नरेशकुमार गोयल यांनी उपस्थित



विद्यार्थ्यांना कारगिल युद्धातील अनुभव सांगितले. गोयल स्वतः या युद्धात सहभागी झाले होते. कर्नल गोयल यांनी कारगिलच्या धोकादायक, उंच पर्वतीय प्रदेशात लढताना भारतीय सैनिकांना आलेल्या विलक्षण आव्हानांचे स्पष्टपणे वर्णन केले.

अत्यंत प्रतिकूल हवामान आणि भौगोलिक परिस्थितीत लढून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन विजय साजरा केला. याचा सर्व भारतीयांना अभिमान आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेते मुकेश ऋषी यांनीही उपस्थितांना संबोधित केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनसीसी प्रमुख ले. सारंग भागवत, एनएसएस प्रमुख प्रा. अमित सुर्वे, प्रा. नितीन गमरे आदींनी विशेष प्रयत्न केले.

# नागोठण्यासाठी स्वतंत्र वीज फीडर बसवावा

## खासदार सुनील तटकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे व परिसरातील नागरिकांना वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे तसेच तांत्रिक बिघाडानंतर वीजपुरवठा सुरळीत होण्यास होणारा विलंब या गंभीर समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी रोहा पंचायत समिती सदस्य समृद्धी कोळी यांनी रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांना निवेदन सादर केले आहे.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस नागोठणे विभाग नेते भाई टके, विभागीय अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, प्रियदर्शनी वाहतूक संस्थेचे अध्यक्ष शैलेश रावकर, रोहा तालुका उपाध्यक्ष रोशन पारंगे, नागोठणे माजी उपसरपंच सुरेश जैन, बिपीन सोष्टे, अंकुश ताडकर यांच्यासह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

या निवेदनात नागोठणे परिसरात झपाट्याने वाढणारे औद्योगिकीकरण, नवीन उद्योग, व्यावसायिक आस्थापना आणि वाढती लोकसंख्या यामुळे विजेची मागणी दिवसेंदिवस वाढत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यमान वीज वितरण यंत्रणेवर अतिरिक्त ताण निर्माण होत असून नागरिक, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, लघुउद्योग, शासकीय कार्यालये तसेच पाणीपुरवठा योजनांवर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

सध्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, नागोठणे येथे नवीन विद्युत सबस्टेशन उभारण्यात येत असून या सबस्टेशनमधून नागोठणे विभागासाठी स्वतंत्र वीज फीडर उपलब्ध करून देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम, अखंडित व विश्वासार्ह होण्यास मदत होईल तसेच वारंवार होणारे वीज खंडित होण्याचे प्रकार कमी होतील, तांत्रिक बिघाडाच्या वेळी पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध होईल आणि नागरिकांसह उद्योगांनाही मोठा दिलासा मिळेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या संदर्भात रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, महावितरणचे वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित शासकीय विभाग यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करून नागोठणे विभागासाठी स्वतंत्र वीज फीडर उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करावा, अशी मागणीही खासदार सुनील तटकरे यांच्याकडे समृद्धी कोळी यांनी केली आहे.

# प्रेमसंबंधातून पाबळ बरडावाडीत तरुणी बनली आई; तरुणावर गुन्हा

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील मोजे बरडावाडी पो. पाबळ येथील अल्पवयीन तरुणीशी लग्न करून तिला गरोदर केल्याप्रकरणी वडखळ पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत माहिती अशी की, आरोपी रा.ताडमाळ पो पाबळ ता पेण याच्या आजीचेच्या राहते घरी आरोपी याने फिर्यादी पीडीता हिचे बरोबर १ फेब्रुवारी ते ३० एप्रिलच्या दरम्यान प्रेमसंबंध होते. या दरम्यान आरोपीने पाबळ येथील शंकराचे मंदिरात पीडितेशी लग्न करुन लग्नानंतर तिला तिचे आजीचे घरी घेवून जावून पिडीता ही वयाने अल्पवयीन व सहमती देण्यास असक्षम असल्याचे माहिती असतानाही पिडीता हिचेशी शरीरसंबध ठेवले.

या दरम्यान ती नऊ महिन्याची गरोदर होवून त्यातून पिडीता हिची दिनांक १६ रोजी प्रसूती होवून मुलास जन्म दिला. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

# पोकलेनचा फावडा लागून तरुणाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खरोशी येथील गोल्डन स्टोन क्रशर कंपनीमध्ये काम करीत असलेल्या ३२ वर्षीय तरुणाला पोकलेनच्या मागच्या बाजूचा फटका लागल्याने त्याचा मृत्यू झाल्याही घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी कि, खरोशी येथील गोल्डन स्टोन क्रशर कंपनी येथे १३ जुलै रात्री ९.५०च्या सुमारास आरोपी रा.पंचायत देवराडी, झांरखड याने त्याच्या ताब्यातील पोकलन मशीन कंपनीच्या आवारात निष्काळजीपणाने चालविल्याने या मशीनचा मागील भाग यातील मयत सद्दाम जलालुद्दीन हुसेन वय ३२ रा.नासीरपुर, उत्तरप्रदेश याच्या चेहऱ्याच्या डाव्या बाजुस लागुन त्यात तो गंभीर दुखापत होऊन मरण पावला. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरक्षक घोलप करीत आहेत.

# श्री कपालेश्वर देवस्थान आणि शिवतांडव प्रतिष्ठानतर्फे कर्जतकरांची वारी

**कर्जत : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री कपालेश्वर देवस्थान आणि शिवतांडव प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने कर्जतकरांच्या वारीचे आयोजन करण्यात आले होते. या वारीमध्ये कर्जतकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



कपालेश्वर मंदिरातील श्री विठ्ठल रुक्मिणीची पूजा अमोल देशमुख व कोमल देशमुख या उभयतांच्या हस्ते करण्यात आली. लोकमान्य टिळक चौकातून वारीचा प्रारंभ झाला. कपालेश्वर देवस्थानाच्या वनिता म्हसे, अभिजीत मराठे, लीला चंदन, सदानंद जोशी, समीर सोहनी, कौस्तुभ परांजपे, निलेश परदेशी तसेच शिवतांडव प्रतिष्ठानचे नमित दांडेकर, नारायण पाटील, रितेश जाधव, निहार व्यापारी, रोहित कानडे यांच्या पुढाकाराने ही वारी निघाली. या वारीच्या पुढे महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर शाळेच्या संतांच्या वेशभूषातील विद्यार्थी होते.

ही वारी शिवतांडव प्रतिष्ठानच्या ढोल पथक सदस्यांनी भजनाच्या तालावर प्रति आळंदी-पंढरपूर येथे येऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन दहिवली येथील घाटावर श्रीरामांचे दर्शन घेऊन पुरातन विठ्ठल मंदिरात सांगता करण्यात आली.

# आषाढीनिमित्त विष्णूनगर शाळेतील विद्यार्थ्यांची दिंडी

**रोहा : प्रतिनिधी**

देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विष्णुनगर या शाळेतील विद्यार्थ्यांनी गावातून दिंडी काढली होती. विष्णूनगर शाळेतील विद्यार्थी बाल वारकरी बनून विठुरायाची पालखी घेऊन उत्साहात दिंडीत सहभागी झाले होते.

या बाल वारकऱ्यांनी विठुरायाला पालखीत बसवून संपूर्ण गावभर पालखीची मिरवणूक काढली. विद्यार्थी व शिक्षक तसेच ग्रामस्थांनी ही मोठ्या उत्साहात मिरवणुकीत सहभागी झाले होते. घराघरात पालखी पूजा करण्यात आली. लेझीम टाळांच्या गजरात विठुरायाची आवडती तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन नाचत वृक्षरोपणाचा संदेश या दिंडीतील भजनातून दिला गेला. विद्यार्थ्यांसह या दिंडीत शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता वरणकर, शिक्षिका तन्वी गुरव, शिक्षक किशोर पोळेकर यांसह पालक आणि विष्णूनगर ग्रामस्थ सहभाग झाले होते.



# आषाढी एकादशीनिमित्त ओंकार विद्यामंदिरात बालवैष्णवांची दिंडी

**मुरुड : प्रतिनिधी**

पंढरपूरच्या विठ्ठल-रखुमाईच्या मंदिरापासून ते खेड्यापाड्यांतून विठ्ठल मंदिरेदेखील आषाढी एकादशीच्या निमित्ताने उजळून निघतात. शालेय जीवनात विठ्ठलाच्या वारीचे महत्व अधोरेखित करण्यासाठी तसेच भक्तीमार्गाचा संस्कार बाल मनावर रुजविण्यासाठी मुरुड येथील हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार बालवाडी व ओंकार विद्यामंदिर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वारकरी वेशात पददिंडी काढून विठूरायाचा जयजयकार करीत पालखी काढली.

हिंदू बोर्डिंग, मारुती नाका, बाजारपेठवरुन शिशुसह, बाल, अरुण व तरुणांनी पददिंडींचा आनंद घेतला. शिक्षकवृंदाचा प्रतिसाददेखील विद्यार्थ्यांइतकाच उस्फूर्त होता.





# मोर्बा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय नूतन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

१०० वर्षांपूर्वी मोर्बा गावातील बुजुर्ग मंडळींनी सुरु केलेल्या मोर्बा सोशल सोसायटी शिक्षण संस्थेला सर्वोतोपरी सहकार्य करणार, असे अभिवचन खासदार सुनील तटकरे यांनी मोर्बा येथील संस्थेच्या कार्यक्रमात बोलताना दिले.



माणगाव तालुक्यातील मोर्बा सोशल सोसायटी शिक्षण संस्थेच्या हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचा भूमिपूजन समारंभ खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते झाला.

कार्यक्रमाला राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष सुशील केकाणे, राजिप सदस्य अस्लम राऊत, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काका नवगणे, अल्ताफ धनसे,पंचायत समिती उपसभापती मनिषा मालोरे, सदस्य अलका केकाणे, शादाब गैबी, राजेंद्र शिर्के, हुसैन रहाटविलकर, गजानन अधिकारी, इकबाल हर्णेकर, नजीर धनसे, आसिफ राऊत, सरपंच शौकत रोहेकर, उपसरपंच झुल्फीखार राऊत, प्रकाश लाड, रज्जाक जळगावकर आदींसह संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी खासदार तटकरे पुढे म्हणाले की, मोर्बा सोशल सोसायटी संस्थेच्या हायस्कूल व ज्युनियर कॉलेजसाठी माध्यमातून हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजसाठी आवश्यक असणारे तळमजला व वरच्या मजल्याचे काम चांगल्या प्रकारे करण्यात येईल. टप्पाटप्प्याने संस्थेला आवश्यक असणारी सर्व कामे करू. या संस्थेत वाणिज्य शाखा व बीएसआयटीला परवानगी घेऊ. यासाठी लागणारी कागदपत्रांची पूर्तता करा. मी पुढील वर्षी २०२७मध्ये त्यांना मंजुरी मिळवून देतो. या शिक्षण संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या संस्थेचे नाव जगात,देशात रोशन करावे. या संस्थेच्या शेजारीच असणाऱ्या मॉडर्न इंग्लिश स्कूलला २५ संगणक व इतर साहित्य निश्चित पुरविले जातील असे त्यांनी आश्वासित करीत शिक्षणाच्या बाबतीत मी असेन, आदिती असेल, अनिकेत असेल आम्ही सर्वजण सहकार्य करू, असे सांगितले.

आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात बोलताना राजिप सदस्य अस्लम राऊत यांनी सांगितले की, जिल्हा परिषद निवडणूक अगोदर मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यावेळी खा. तटकरे साहेबांना विविध कामांविषयी विनंती केली होती. त्यापैकी एक काम म्हणजे मोर्बा सोशल सोसायटी शिक्षण संस्थेची नवीन इमारत. या इमारतीचे कामाचा शुभारंभ होताना आज मला आनंद होत आहे. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले हे तटकरे साहेबांच्यात दिसून येते. यावेळी त्यांनी शिक्षण संस्थेत वाणिज्य शाखा व बीएसआयटी सुरू करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे मार्गदर्शक आसफ पल्लवकर यांनी केले.

# कै.सार्थक खराडेच्या स्मरणार्थ शैक्षणिक साहित्य भेट, वृक्षारोपण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कै.सार्थक राकेश खराडे याच्या सातव्या पुण्यस्मरणदिनानिमित्त कष्टकरीनगर राजिप शाळेमध्ये समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अभिजीत भुजबळ, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे, उपनिरीक्षक सुधीर शिंदे, सरपंच रंजना गायकवाड, माजी उपसरपंच विश्वनाथ गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष प्रिया पाटील, उपाध्यक्ष राजू पवार, ग्रामपंचायत सदस्य विलास पाटील, नजमा साखरेकर, सचिन मते, संदीप पाटील, मुख्याध्यापक दीपक कासारे, शालन काळे, जयश्री ताम्हाणे, अनिता वाघमारे, उपशिक्षक शर्मीला उपरे, काजोल कांबळे आदी उपस्थित होते.

कष्टकरीनगर राजिप शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या ७५ विद्यार्थ्यांना ४०० वह्या, शालोपयोगी साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले. २० प्लास्टिकच्या नवीन खुर्च्यांची भेट देण्यात आली. यानंतर शाळेच्या परिसरात मान्यवरांच्या हस्ते विविध रोपांचे वृक्षारोपणही करण्यात आले. याशिवाय रसायनी परिसरातील इतर चार शाळांतही ११०० वह्या व शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.



# आषाढी एकादशीनिमित्त साजगावच्या मंदिरात भाविकांनी घेतले विठूरायाचे दर्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या खालापूर तालुक्यातील साजगाव-ताकई येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशीच्या निमित्ताने शनिवारी वारकरी व भाविकांचा महापूर उसळला होता. पहाटेच्या महापूजेनंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आल्यावर दिवसभर विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. संपूर्ण परिसर 'विठ्ठल.. विठ्ठल'च्या अखंड नामगजराने दुमदुमून गेला.



या वर्षीच्या मानाच्या महापूजेचा मान विठोबा देवस्थान संस्थेचे अध्यक्ष ए. जी. पाटील व त्यांच्या कुटुंबीयांना लाभला. पहाटे चार ते पाच या वेळेत सपत्नीक महापूजा विधिवत पार पडली. त्यानंतर सर्वसामान्य भाविकांसाठी मंदिराचा गाभारा खुला करण्यात आला.

खोपोली, खालापूर, पनवेल, अलिबाग, पेण, पाली तसेच रायगड जिल्ह्यातील विविध भागांतून हजारो भाविक दर्शनासाठी साजगाव येथे दाखल झाले होते. खोपोलीतील विविध सामाजिक संस्था, वारकरी संप्रदाय, ज्येष्ठ नागरिक संघ तसेच गावागावांतून आलेल्या पायी दिंड्यांनी विठ्ठलाच्या दर्शनासाठी धाकट्या पंढरीत हजेरी लावली. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

# स्थानिकांचा विरोध असेल तर बल्क ड्रग पार्कसह कोणतेही रासायनिक कारखाने होणार नाहीत -खासदार सुनील तटकरे

**माणगाव : बातमीदार**

स्थानिकांचा विरोध असेल तर माणगाव-रोहा परिसरात प्रस्तावित बल्क ड्रग पार्कसह कोणतेही रासायनिक कारखाने होऊ दिले जाणार नाहीत, अशी ठाम ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिली.



बल्क ड्रग पार्क संघर्ष समिती व सुमारे २० ते २५ बाधित गावांतील नागरिकांनी आयोजित केलेल्या गीता बाग येथील सभेत ते बोलत होते. या सभेस संघर्ष समितीचे अध्यक्ष बाबुशेठ खानविलकर, पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, समितीचे उपाध्यक्ष संदीप जाधव, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, तालुकाध्यक्ष काका नवगणे, सरपंच दीपक जाधव, अनंत महाडिक, विपुल उभारे, राजा रणपिसे, सुधीर पवार, समितीचे सचिव संतोष जागडे, सरपंच दत्ता खांबे, संजय खानविलकर, मिलिंद खानविलकर, भागाराम मंचेकर, बाळाराम दबडे, जनार्दन सिलिमकर, संभाजी जाधव, नरेश कदम, प्रदीप चव्हाण, मंगेश पवार, गणेश सुकूम, देवराम उभारे, रमेश लाडघरे, धोंडू पाटणे यांच्यासह संघर्ष समितीचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना खासदार तटकरे यांनी रोहा एमआयडीसीमुळे निर्माण झालेल्या प्रदूषणाचा उल्लेख करताना दूषित पाणी, हवेचे प्रदूषण आणि शेतीवरील परिणामांचा अनुभव रायगड जिल्ह्याने घेतला असल्याचे सांगितले. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारचे प्रकल्प स्थानिकांच्या इच्छेविरुद्ध होणार नाहीत याची खात्री त्यांनी उपस्थितांना दिली.

संघर्ष समितीने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा संदर्भ देत तटकरे म्हणाले, स्थानिकांच्या भावना आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत. बल्क ड्रग पार्क असो किंवा कोणताही रासायनिक उद्योग, स्थानिकांचा विरोध असेल तर तो प्रकल्प होणार नाही. या प्रश्नावर मी, मंत्री आदिती तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे स्थानिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू.

प्रारंभी सरपंच दीपक जाधव, संघर्ष समितीचे अध्यक्ष बाबुशेठ खानविलकर आणि सभापती विलास शिंदे यांनी संघर्ष समितीची भूमिका व बल्क ड्रग पार्क प्रकल्पाबाबतची भूमिका मांडली. शेवटी संजोग मानकर यांनी खासदार तटकरे यांनी संघर्ष समितीला दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानले.

# अनाहत सिंगने रचला इतिहास!

## पहिल्या जागतिक ज्युनियर स्क्वॅश विजेतेपदाला गवसणी

**ओटावा : वृत्तसंस्था**

कॅनडातील नायगारा-ऑन-द-लेक येथे झालेल्या २०२६ जागतिक स्क्वॅश ज्युनियर चॅम्पियनशिपच्या मुलींच्या एकेरीच्या अंतिम सामन्यात इजिप्तच्या रुकाया सालेमला पराभूत करून अनाहत सिंगने इतिहास रचला. अव्वल मानांकित आणि भारताची नंबर १ खेळाडू अनाहत सिंगने द्वितीय मानांकित सालेमला ३-० (११-३, ११-७, ११-७) ने पराभूत करून ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियन बनणारी पहिली भारतीय स्क्वॅश खेळाडू होण्याचा मान मिळवला.



अनाहतने ऑस्ट्रेलियन पात्रताधारक लिली विल्सनवर ३-०ने विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. त्यानंतर तिने हाँगकाँग, चीनच्या पुई यिन क्लो लो आणि मलेशियाच्या डॉइस यू सॅन ली यांचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली. या युवा खेळाडूने इजिप्शियन खेळाडूंविरुद्धच्या सलग तीन आव्हानांपैकी पहिले आव्हान जिंकून हबीबा रिझकला ३-१ने पराभूत केले. त्यानंतर तिने उपांत्य फेरीत बार्ब समेहला ३-१ (११-३, ८-११, ११-४, ११-६)ने मात केली होती. आणि अखेरीस अंतिम फेरीत सालेमला पराभूत केले. या निकालामुळे २०११पासून सुरू असलेले इजिप्तचे ज्युनियर मुलींच्या जागतिक विजेतेपदावरील वर्चस्वही संपुष्टात आले.



गेल्या वर्षी कैरोमध्ये कांस्यपदक जिंकून अनाहतने ज्युनियर जागतिक चॅम्पियनशिपमधील वैयक्तिक पदकासाठी भारताची १५ वर्षांची प्रतीक्षा संपवली होती. या वर्षीचा ड्रॉ भारतीय खेळाडूंना अनुकूल होता, कारण चार वेळा इजिप्शियन चॅम्पियन ठरलेली अमिना ओर्फी आता ज्युनियर स्पर्धांमध्ये भाग घेण्यास अपात्र ठरली होती.

मुलींच्या एकेरीमध्ये अंतिम फेरीत पोहचणारी अनाहत ही एकमेव भारतीय खेळाडू होती. रुद्र सिंग, अनिका दुबे आणि सान्वी कलंकी हे सर्व ३२च्या फेरीतच पराभूत झाले. मुलांच्या एकेरीमध्ये विद्यमान आशियाई ज्युनियर चॅम्पियन आर्यवीर देवानने १६च्या फेरीत पोहचून भारताची मान उंचावली. युशा नफीस आणि गुरवीर सिंग ३२च्या फेरीतच बाद झाले, तर पूर्वव रामभिया ६४च्या फेरीत पराभूत झाला.

**दमदार कामगिरी**

अनाहतच्या विजयाने २००५मध्ये जोशना चिनप्पाने मिळवलेल्या उपविजेतेपदाला मागे टाकले. ही कामगिरी गेल्या दोन दशकांहून अधिक काळातील ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिपमधील भारताची सर्वोत्तम कामगिरी मानली गेली. हा अंतिम सामना जिंकणे स्पर्धेतील तिच्या प्रभावी कामगिरीचा कळस होता. आठवडाभर सामन्यावर वर्चस्व गाजवणाऱ्या अनाहतचे सामन्यावर मजबूत नियंत्रण होते. विजेतेपदाच्या मार्गावर अनाहतने सहा सामन्यांमध्ये फक्त दोन सेट गमावले. पहिल्या तीन सामन्यांमध्ये तिने एकही सेट न गमावता आपल्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले.

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ऋषिकांत सिंगला रौप्यपदक

**ग्लासगो : वृत्तसंस्था**



भारताने २०२६च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत आपले दुसरे पदक मिळवले. ऋषिकांत सिंगने पुरुषांच्या ६० किलो वजनी गटातील वेटलिफ्टिंग स्पर्धेत २६४ किलो वजन उचलून रौप्य पदक जिंकले. त्याने स्नॅचमध्ये १२१ किलो वजन उचलून या स्पर्धेत एक नवीन स्नॅच विक्रमही प्रस्थापित केला. ऋषिकांतने क्लीन अँड जर्कमध्ये १४३ किलो वजनही उचलले. ऋषिकांतने सुवर्णपदकासाठी प्रयत्न केला, पण १४५ आणि १५१ किलो वजन उचलण्यात तो दोनदा अयशस्वी ठरला. मलेशियाच्या बिन कासदान मोहम्मद अनिकने सुवर्णपदक जिंकले, तर केनियाच्या जोशुआ अमुंगा म्बोयाने कांस्यपदक पटकावले.

मणिपूरच्या ऋषिकांत सिंगने ११६ किलोने सुरुवात केली, त्यानंतर ११९ किलो आणि तिसऱ्या प्रयत्नात १२१ किलो वजन उचलले. नंतर अनिकनेही तेवढेच वजन उचलल्याने स्नॅचमध्ये सामना बरोबरीत सुटला. क्लीन अँड जर्कमध्ये या भारतीय वेटलिफ्टरला केवळ १४३ किलो वजन उचलता आले. मलेशियाच्या अनिकने १५२ किलो वजन उचलून पहिले स्थान पटकावले. त्याने एकूण २७३ किलो वजन उचलले. म्बोया २६० किलो वजनासह तिसऱ्या स्थानी राहिला.

# अर्धशतकासह ईशान रोहित-विराटच्या पंक्तीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



आयसीसी टी-२० क्रमवारीतील अव्वल फलंदाज ईशान किशन याने हरारे स्पोर्ट्स क्लबवर रंगलेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात शानदार खेळीचा नजराणा पेश केला. आंतरराष्ट्रीय टी-२० कारिकिर्दीतील दुसऱ्या शतकाची त्याची संधी थोडक्यात हुकली, पण ८१ धावांच्या खेळीसह त्याने सर्वाधिक वेळा फिफ्टी प्लसचा डाव साधणाऱ्या भारतीय दिग्गजांच्या पंक्तीत स्थान मिळवले आहे.

ईशानने झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात ४४ चेंडूत नऊ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ८१ धावांची खेळी केली. टी-२० कारकिर्दीतील १२व्या अर्धशतकासह त्याने १३व्या वेळी फिफ्टी प्लसचा डाव रचला. भारताकडून टी-२०मध्ये सर्वाधिक वेळा ५० किंवा त्यापेक्षा अधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत विराट कोहली अव्वलस्थानी आहे. त्याने टी-२० कारकिर्दीत ३९ वेळा ही कामगिरी केली आहे. रोहित शर्माने ३७ वेळा, तर सूर्यकुमार यादव आणि लोकेश राहुल यांनी अनुक्रमे २९ आणि २४ वेळा हा डाव साधला आहे. ईशानने अभिषेक शर्माची बरोबरी करत दिग्गजांच्या खात यादीत स्थान मिळवले.

# स्ट्राईक रेटमध्ये वैभव सूर्यवंशीने जयवर्धनेला टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**



भारताचा १५ वर्षीय 'वंडर बॉय' वैभव सूर्यवंशी आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सातत्याने विक्रमांची नोंद करत आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात मोठी खेळी करण्यात तो अपयशी ठरला, पण अवघ्या नऊ चेंडूत २० धावांच्या खेळीसह त्याने श्रीलंकेचा दिग्गज महेला जयवर्धने याचा मोठा विक्रम मोडीत काढला.

वैभवने २११.३२च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिल्या पाच सामन्यांत सर्वाधिक स्ट्राईक रेट राखणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो आता दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे.

यापूर्वी या यादीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या महेला जयवर्धनेने पहिल्या पाच टी-२० सामन्यांत २०१.८२च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली होती. वैभवने त्याला मागे टाकत दुसरे स्थान पटकावले. या यादीत भारताचा माजी अष्टपैलू युवराज सिंह २३५.०९च्या स्ट्राईक रेटसह अव्वल स्थानावर आहे. विशेष म्हणजे ही आकडेवारी केवळ पूर्ण सदस्य देशांच्या खेळाडूंसाठी असून असोसिएट देशांच्या खेळाडूंचा यात समावेश नाही.

झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेतील पहिल्याच टी-२० सामन्यात वैभव सूर्यवंशीने अर्धशतक झळकावत सचिन तेंडुलकरचा ऐतिहासिक विक्रम मोडला होता. याशिवाय टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात कमी वयात अर्धशतक करणारा फलंदाज म्हणूनही त्याने नवा विश्वविक्रम आपल्या नावावर केला.

# टीम इंडियाची स्वतःच्याच विश्वविक्रमाशी बरोबरी

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघाने झिम्बाब्वे दौऱ्यातील सलग दुसऱ्या विजयासह तीन सामन्यांची टी-२० मालिका खिशात घातली. हरारे येथे खेळवण्यात आलेल्या सामन्यात भारताने निर्धारित २० षटकांत ५ बाद २१९ धावांचा डोंगर उभा केला. भारताने एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक वेळा २००पेक्षा अधिक धावसंख्या उभारण्याच्या स्वतःच्याच विश्वविक्रमाशी बरोबरी साधली.

आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक वेळा २०० किंवा त्याहून अधिक धावा करण्याचा विश्वविक्रम भारताच्या नावावर आहे. २०२४नंतर आता २०२६मध्येही भारताने नवव्यांदा २००पेक्षा अधिक धावसंख्या उभारली. याआधी २०२३मध्ये भारताने सात वेळा २००पेक्षा अधिक धावा केल्या होत्या. एका वर्षात नऊ वेळा हा टप्पा गाठणारा भारत हा एकमेव संघ आहे.






**पनवेल : जपानी शोतोकॉन कराटे क्लास कोपर गावात सेक्टर आर ४मध्ये सुरू करण्यात आला आहे. त्याचे उद्घाटन शिवकर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनेश ढवळे यांच्या हस्ते झाले. यावेळी कृती समितीचे खजिनदार संतोष पवार, वडघर विभागीय अध्यक्ष संदीप नाईक, नियती स्पोर्ट्सचे अध्यक्ष वासुदेव भोईर, ब्लॅक बेल्ट चॅम्पियन रमेश, सदन डाऊर, आशिष तारेकर, रोहिदास पाटील, महेश पाटील, लालचंद गावंड, दर्शन पाटील, सौरभ रोडपालकर, राज जोशी उपस्थित होते.**



# झिम्बाब्वेविरुद्ध भारतीय संघाची विजयी आघाडी



**हरारे : वृत्तसंस्था**

भारताने झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत आपले वर्चस्व कायम राखत दुसऱ्या सामन्यात तब्बल ९० धावांनी शानदार विजय मिळवला. हरारे येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजीत भारताने २० षटकांत ५ बाद २१९ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात झिम्बाब्वेचा संपूर्ण संघ १७.५ षटकांत अवघ्या १२९ धावांत गारद झाला. या विजयासह भारताने मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेत मालिका खिशात घातली.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारताची सुरुवात सावध झाली, मात्र तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या ईशान किशनने ४४ चेंडूत ८१ धावांची झंझावाती खेळी साकारत डावाला वेग दिला. त्याने अर्धशतकासह झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई केली. त्याला तिलक वर्माने २९ चेंडूत नाबाद ६० धावांची स्फोटक साथ दिली. कर्णधार श्रेयस अय्यरने २५, तर युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने अवघ्या नऊ चेंडूत २० धावा करत भारताची धावसंख्या २१९पर्यंत पोहचवली.

२२० धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची फलंदाजी भारतीय गोलंदाजांसमोर पूर्णपणे निष्प्रभ ठरली. ब्रायन बेनेटने सर्वाधिक झुंज देत काही काळ प्रतिकार केला, तर तडिवानाशे मारुमानी (२४), रायन बर्ल (२०) आणि ब्रॅड इव्हान्स (१९) यांनी थोडाफार संघर्ष केला, मात्र इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. भारताकडून अभिषेक शर्माने तीन बळी घेत सर्वाधिक प्रभावी कामगिरी केली. त्याच्यासोबत यश ठाकूर आणि प्रिन्स यादव यांनी प्रत्येकी दोन विकेट्स, तर रवी बिश्नोई, शिवम दुबे आणि तिलक वर्मा यांनी प्रत्येकी एक बळी घेत झिम्बाब्वेचा डाव १२९ धावांत संपवला.

सलग दुसरा विजय मिळवत भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. फलंदाज आणि गोलंदाज या दोन्ही विभागांत भारतीय संघाने दमदार कामगिरी करत झिम्बाब्वेला एकतर्फी पराभवाचा धक्का दिला. आता तिसरा सामना जिंकून मालिका ३-०ने खिशात घालण्याच्या इराद्याने टीम इंडिया मैदानात उतरणार आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com